सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | बुधवार, दि. ३ डिसेंबर २०२५ | वर्ष - ३ रे | अंक २३७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### बीडमध्ये रोकड, शस्त्र सापडल्याने खळबळ

**बीड :** एका स्कुटीच्या डिकीमध्ये पैसे आणि धारदार शस्त्र सापडल्याने एकच खळबळ उडाली. एक संशयित तरुण फिरत असताना काही तरुणांनी त्याला अडवून विचारपूस केली. याच वेळी त्याच्या स्कुटीची झाडाझडती घेतल्यानंतर स्कुटीच्या डिक्कीमध्ये अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही पॉम्पलेट्स त्यामध्ये पैसे, धारदार शस्त्र आढळून आले.

### पैसे वाटतानाचा व्हिडीओ व्हायरल

**चंद्रपूर :** चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा शहरात भाजप उमेदवाराकडून मतदारांना पैशाचे आमिष देत घराच्या मागील भागातून पैसे वाटतांना व्हिडीओ व्हायरल झालाय. राजुरा नगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ४ चे भारतीय जनता पक्षाचे नगरसेवक पदाचे उमेदवार अमोल चिल्लावार यांचे वडील आणि भाजप नेते पांडूरंग चिल्लावार हे निवडणूकीत ५०० रूपयांच्या नोटा मतदारांना वाटल्याचा विडीओ व्हायरल झाल्याने खळबळ उडाली.

### बहीण-भावाला खाजगी बसने चिरडले

**पुणे :** हिंजवडी येथे एका खाजगी बसच्या अपघातात पाच जण चिरडले गेले असून त्यात दोघा सख्या शाळकरी बहीण-भावाचा मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे.

# सर्व ठिकाणची मतमोजणी २१ डिसेंबरलाच!

## नगरपालिका, नगर परिषदांचा निकाल पुन्हा लांबणीवर । हायकोर्टाचा दणका

**मुंबई : राज्यातील नगरपालिका, नगर परिषदेच्या निवडणुकीतल डावात मचाळा अजून थांबलेला नाही. नगरपालिका, नगर परिषदांचा निकाल उद्या लागणार होता. पण तो आता लांबणीवर पडला आहे. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने सर्व निकाल हा २१ डिसेंबरपर्यंत जाहीर न करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच एक्झिट पोलही सध्या जाहीर न करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे उद्या मतमोजणी आणि निकाल जाहीर होणार नाही. आता निकाल २१ डिसेंबर २०२५ रोजी जाहीर होणार आहे. उद्या होणारी मतमोजणी आणि निकाल जाहीर होणार होते. पण नागपूर खंडपीठाने सर्व नगरपालिकांची मतमोजणी आणि निकाल २१ डिसेंबर रोजी जाहीर करण्याचे निर्देश नुकत्याच झालेल्या सुनावणीत देण्यात आले. पण तोपर्यंत म्हणजे २१ डिसेंबरपर्यंत आचारसंहिता कायम राहणार आहे. तर आज होणाऱ्या मतदान प्रक्रियेवर या निकालाचा कोणताही परिणाम होणार नाही असे खंडपीठाने स्पष्ट केले आहे.**



राज्य निवडणूक आयोगाने ४ नोव्हेंबर २०२५ रोजी राज्यातील २४६ नगरपरिषदा आणि ४२ नगरपंचायतींच्या (एकूण २८८) सार्वत्रिक निवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्याविरोधात अनेक उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात धाव घेतली होती. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णयाविरुद्ध अपील असलेल्या प्रकरणांचा निर्णय २३ नोव्हेंबर २०२५ रोजी किंवा त्यानंतर आल्याने २४ नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या अध्यक्षपदाच्या आणि सदस्यपदांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या. आज या ठिकाणी मतदान होणार नव्हते. पण या नगर परिषदांबाबत न्यायालयीन प्रक्रिया प्रलंबित असल्याने राज्यातील सर्व नगरपालिका, नगर परिषद निवडणुकांचे निकाल एकाच दिवशी जाहीर व्हावेत. अन्यथा या २४ नगर परिषदांच्या निकालावर त्याचा प्रभाव पडू शकतो, असा युक्तीवाद दाखल याचिकांमध्ये करण्यात आला होता. त्यानुसार, नागपूर खंडपीठाने सर्व नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकींचा निकाल एकाच दिवशी म्हणजे २१ डिसेंबरला जाहीर करण्याचे निर्देश दिले. तसेच या निवडणुकीचे एक्झिट पोलही २० तारखेला निवडणूक संपल्यानंतर अर्ध्या तासाने जाहीर करता येतील असे स्पष्ट केले.

### न्यायाधीश नेमकं काय म्हणाले?

ज्या अर्थी एक्झिट पोल अखेरचे फेजचे मतदान संपेपर्यंत जाहीर केले जात नाही. कारण मतदानाचे सर्व फेज फ्री अँड फेयर राहिले पाहिजे, त्या अर्थी नगरपरिषदेच्या निवडणुकीचा २ डिसेंबरचा टप्पा पार पडल्यानंतर, २० डिसेंबरचे मतदान व्हायचे असताना, ३ डिसेंबरला मतमोजणी करून निकाल कसे घोषित करू शकता? असा सवाल करत राज्यातील नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकीच्या निकालाबाबत मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने महत्त्वाचा निकाल दिला आहे. आपण याला एक निवडणूक म्हणून मानले पाहिजे. लोकसभेत १ फेज झाल्यानंतर निकाल जाहीर करता की अखेरच्या फेजपर्यंत थांबता? मग इथे असे का? असा प्रश्नही न्यायालयाने केला आहे.

दरम्यान, राज्य निवडणूक आयोगाने हा प्रचंड मोठा घोळ घातला आहे. आम्ही नियमाने बोलल्यावरही राज्य निवडणूक आयोगाने ऐकले नाही. हे चुकीच्या पद्धतीने चालले आहे. ज्या पद्धतीने राज्य निवडणूक आयोगाने घोळ घातला, त्याप्रमाणे आता त्यांनी पुढे जावे. आगामी निवडणुका मोठ्या आहेत. हा घोळ राज्य निवडणूक आयोगाने संपवावा. नाहीतर आम्ही प्रचार करायचा आणि निवडणूक आयोगाने एक पत्र काढून निवडणुका पुढे ढकलायच्या हे काही योग्य नाही, अशी प्रतिक्रिया चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

### न्यायालयाचा निर्णय मान्य करावा लागेल : मुख्यमंत्री



दरम्यान, यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, मी अजून न्यायालयाचा निकाल वाचलेला नाही. पण खंडपीठाने दिलेला निकाल सगळ्यांना मान्यच करावा लागेल. गेले २५ ते ३० वर्षे मी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहतोय. पण असं पहिल्यांदाच घडतंय की घोषित केलेल्या निवडणुका पुढे ढकलल्या आहेत, त्याचे निकाल देखील पुढे ढकलले गेले आहेत. ही पद्धत योग्य वाटत नाही. मात्र, आपल्याला हा निर्णय मान्य करावा लागेल. कारण मुंबई उच्च न्यायालयाचं नागपूर खंडपीठ स्वायत्त आहे आणि निवडणूक आयोगही स्वायत्त आहे. परंतु, अशा निर्णयामुळे जे उमेदवार आहेत, जे मेहनत करतात, प्रचार करतात त्यांचा भ्रमनिरास होतो. माझी निवडणूक आयोगावर नाराजी नाही. पण कायदेशीर प्रक्रियेवर नाराजी आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### निवडणूक आयोगावर न बोललेलेच बरे : ठाकरे

राज्यात एकीकडे निवडणुकीची धामधूम सुरु असताना दुसरीकडे शिवसेना ठाकरे गटात पक्षप्रवेशाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी त्यांना निवडणुकांचे निकाल २१ डिसेंबरला जाहीर केला जाणार असल्याबद्दल विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी एका वाक्यात प्रतिक्रिया दिली. निवडणूक आयोग आणि न्यायालय यावर न बोलेलंच चांगलं, असा खोचक टोला ठाकरे यांनी लगावला.

# बीडमध्ये मतदानाला लागले हिंसक वळण

**बीड :** राज्यात आज नगरपरिषदा आणि नगरपंचायतींसाठी निवडणुका होत आहेत. सकाळपासून मतदान प्रक्रिया सुरु झाली आहे. काही ठिकाणी सुरळीत मतदान सुरु आहे, तर काही ठिकाणी समस्या आहेत. बीडच्या गेवराईमध्ये नगरपरिषद निवडणुकीत पवार गट आणि पंडित गटाचे कार्यकर्ते आपसात भिडले आहेत. माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या घरासमोरच कार्यकर्त्यांमध्ये तुफान राडा झाला आहे. परिसरात तणावाचे वातावरण असून पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात आहे.

गेवराईच्या मोंढा भागातील मतदान केंद्रावर मोठा राडा झाल्याचे पाहायला मिळाले. शहरातील मोंढा भागातील मतदान केंद्राबाहेर दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये जोरदार धक्का-बुक्की आणि शिवीगाळ झाली. याच दरम्यान काही अज्ञात तरुणांनी रस्त्यावर उभी असलेल्या वाहनांची तोडफोड केली. दोन-तीन वाहनांच्या काचा फोडण्यात आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले.

शहरातील मोंढा भागातील मतदान केंद्राबाहेर दोन्ही गटातील कार्यकर्त्यांमध्ये जोरदार धक्का-बुक्की आणि शिवीगाळ झाली. याच दरम्यान काही अज्ञात तरुणांनी रस्त्यावर उभी असलेल्या वाहनांची तोडफोड केली. दोन-तीन वाहनांच्या काचा फोडण्यात आल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनास्थळी तात्काळ गेवराई पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या घरासमोरच काही व्यक्तींनी दगडफेक केली. अचानक झालेल्या या घटनेमुळे परिसरात मोठा गोंधळ उडाला. पवार गटाच्या कार्यकर्त्यांनी हा प्रकार पंडित गटातील कार्यकर्त्यांनी घडवून आणल्याचा आरोप केला असून पोलिसांनी दोन्ही बाजूंकडील काही जणांना ताब्यात घेतल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी अतिरिक्त फोर्स मागवून संपूर्ण शहरात गस्त वाढवली आहे.




# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## फिरत्या कायदेविषयक जनजागरण अभियानास प्रतिसाद

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत लातूर तालुक्यातील सिकंदरपूर येथे नुकतेच फिरते न्यायालय-मोबाईल व्हॅन उपक्रमाद्वारेउपक्रमाद्वारे कायदेविषयक जनजागरण अभियान राबविण्यात आले.

लातूर जिल्हा विधी सेवा प्राधिरकरां व ग्रामसंसद सिकंदरपूर यांच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात महिलाविषयक कायदे, ज्येष्ठ बगारीक कायदा, घरगुरी हिंसाचार प्रतिबंधक कायदा आदींवर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून समाजातील गोर गरीब, आर्थिक दुर्बलांना न्यायविषयक अडचणीची सोडवणूक करण्याकामी सहाय्य केले जाते. या उपक्रमात ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला . यावेळी विधी सेवा प्राधिकरण सचिव न्या. व्ही.एन. गिरवलकर, सरपंच प्रा. रेशमा गंभीरे, माधवराव गंभीर, एड. गुरुसिद्ध मिटकरी, एड. सोमवंशी, एड. तिवारी, एड. शेळके, एड. गायकवाड यांची उपस्थिती होती. या उपक्रमाद्वारे ग्रामपंचायत सर्वंकष सक्षम करणे हा उद्देश आहे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुख्याध्यपक तलभोगे यांनी तर आभार प्रदर्शन ग्राम पंचायत अधिकारी के.बी.कलबुने यांनी केले.



# उद्योग व्यवसायात यशस्वी होण्यासाठी माहिती व ज्ञान आत्मसात करावे

## एमईएच्या मेळाव्यात माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आवाहन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** सध्याचे युग स्पर्धेचे असून जागतिक बाजारपेठेत टिकून राहणे मोठे आव्हानाचे आहे. उद्योग व्यवसायाच्या माध्यमातून बाजार पेठेत आपले स्थान निर्माण करण्यासाठी माहिती व ज्ञान अत्यंत आवश्यक आहे. नवनविन माहिती व ज्ञानाच्या आधारे उद्योग व्यवसाय भरभराटीस येत आहेत. त्यामुळे उद्योग व्यवसायात यशस्वी होण्यासाठी माहिती व ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन करून याकरिता मराठा इंटरप्रिनियर्स असोसिएशन (एमईए) ने जे व्यासपीठ उभे केले आहे त्याचा आधार घ्यावा, असे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी सांगितले.

लातूर शहरातील वाडा हॉटेल येथे मराठा इंटरप्रिनियर्स असोसिएशनच्या वतीने लातूर शहरासह जिल्ह्यातील मराठा समाजातील व्यावसायिक व उद्योजकांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यात माजी मंत्री दिलीपराव देशमुख बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर, माजी



आ. धिरज देशमुख, वास्तुविशारद गोपाळ शिंदे, एमईएचे अध्यक्ष विक्रम गायकवाड, विक्रम नरसाळे, सिद्राम साठे, संजय शिंदे आदींची उपस्थिती होती.

राजकीय विचारसरणी भिन्न असली तरी समाजहितासाठी आम्ही एका व्यासपीठावर एमईएच्या माध्यमातून एकत्र आलो असल्याचे सांगत माजी मंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर म्हणाले की, एकमेकांचे सहकार्य व आधार यामुळेच व्यवसाय व उद्योग मोठा होऊ शकतो, असे स्पष्ट केले. एमईएने मराठा समाजातील इच्छूकांना उद्योग व्यवसायात आणण्यासाठी जी पाऊले उचलली आहेत. ती पावले आता थांबता कामा नये, असे सांगून व्यवसाय व उद्योगात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी एमईएने पुढाकार घ्यावा, असेही सांगितले.

एमईएने जे व्यासपीठ उभे केले आहे त्या माध्यमातून समाजाच्या हितासह उन्नतीसाठी कार्य होवून समाजात परिर्वतन घडावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. मराठा समाजात अनेक गुणवंत आहेत. मात्र त्यांच्याकडे आर्थिक पाठबळ नाही, हे पाठबळ मिळवून देण्यासाठी एमईए निश्तिच काम करेल, असा विश्वास धिरज देशमुख यांनी व्यक्त केला.

एमईएचे अध्यक्ष विक्रम गायकवाड यांनी सांगितले की, व्यवसाय व उद्योगासाठी समाज एकत्र व्हावा, अशी अपेक्षा सातत्याने व्यक्त होत होती. या अपेक्षेची पूर्तता करण्यासाठीच २०१६ साली एमइएची स्थापना केली असून या माध्यमातून व्यवसाय उद्योगात येऊ इच्छिणाऱ्यांना जे जे आवश्यक आहे ते ते सर्व उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही पुढाकार घेत आहोत, असे सांगितले. सूत्रसंचालन सतीश हानेगाव तर आभार उमेश सोकंडे यांनी केले.

# दिव्यांग दिनानिमित्त आज जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाअंतर्गत जागतिक दिव्यांग दिन साजरा होणार आहे. या अंतर्गत बुधवारी शहरातील रूक्मिणी मंगल कार्यालयात दिव्यांग मुलां-मुलींच्या सांस्कृतिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे राहतील.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, महानगरपालिकेच्या आयुक्त, मानसी मीना, जिल्हा पोलीस अधिक्षक अमोल तांबे, केंद्रीय सल्लगार समितीचे सदस्य सुरेश पाटील, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी असलम तडवी, समाज कल्याणचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार, जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी अप्पासाहेब चाटे यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार आहे. या सांस्कृतिक स्पर्धेत जिल्ह्यातील मुकबधिर, अस्थिव्यंग, अंध, गतिमंद व बहुविकलांग प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांचा समावेश असणार आहे.

दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय सांस्कृतिक स्पर्धेसाठी व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व दिव्यांग बांधवांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी, समाज कल्याणचे सहायक आयुक्त यादव गायकवाड यांनी केले आहे.

३ ते ९ डिसेंबर दरम्यान विविध कार्यक्रम घेवून दिव्यांगांना सक्षम बनविण्यासाठी दिव्यांग सप्ताह साजरा केला जाणार आहे. या सप्ताह अंतर्गत विविध कार्यक्रम घेण्यात येणार असून भौतिक, वाचा व भाषा उपचार पध्दतीसह दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी चित्रकला स्पर्धा, युडीआयडी नोंदणी, कृत्रिम अवयव शिबीर, आयुष्मान भारत व वैश्रि्वक कार्ड ई-केवायसी शिबीरही घेण्यात येणार आहेत, अशी माहिती जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी संतोषकुमार नाईकवाडी यांनी दिली.

## मेस्को क्षेत्रीय कार्यालयात लिपिक पदासाठी भर्ती

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** जिल्ह्यातील माजी सैनिक यांनी लातूर मेस्को क्षेत्रीय कार्यालय येथे लिपिक टंकलेखक पद तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनवर भरण्यात येणार आहे. तसेच या पदासाठी सैन्य सेवेत लिपिक या कामाचा अनुभव व मराठी, इंग्लिश टायपिंग असल्यास प्राधान्य दिले जाईल.

या पदासाठी इच्छूक माजी सैनिकांनी आपल्या अर्ज व सर्व मूळ कागदपत्रांसह ५ डिसेंबर, २०२५ रोजी लातूर जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे कागदपत्रे जमा करुन नाव नोंदणी करावी, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.



# ११ डिसेंबरला नागपूर विधानभवनावर मोर्चा : बेडगे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्यावतीने राज्यातील सार्वजनिक ग्रंथालय कार्यरत असणाऱ्या ग्रंथपाल व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना किमान वेतन देण्यात यावे या प्रमुख मागणीसह वर्षानुवर्षे प्रलंबित असणाऱ्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी येत्या दि. ११ डिसेंबर २०२५ रोजी माजी मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार यांच्या नेतृत्वाखाली नागपूर विधानभवनावर भव्य मोर्चा काढण्यात येणार असल्याचे विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे यांनी सांगितले.

नागपूर विधान भवनावर काढण्यात येणाऱ्या मोर्चाच्या पूर्व तयारीच्या अनुषंगाने रविवार, दि. ३० नोव्हेंबर रोजी लातूर येथे आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीत उपस्थितांनामार्गदर्शन करताना सदाशिव बेडगे बोलत होते. यावेळी ग्रंथात कर्मचारी विकास परिषदेचे प्रदेश संघटक विद्यासागर हणमंते, प्रदेश उपाध्यक्ष बालाजी कांगणे, मराठवाडा कार्याध्यक्ष मनोहर गायकवाड, संघटक निळकंठ होनमोडे, लातूर जिल्हाध्यक्ष श्रीधर स्वामी, उपाध्यक्ष सूर्यकांत जाधव, सौ. वैशाली दुरुगकर, सचिव संतोष करमले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना सदाशिव बेडगे यांनी ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना आपल्या न्याय मागण्यांच्या सोडवणुकीसाठी संघटित होणे किती गरजेचे आहे, हे अतिशय तळमळीने सांगितले. कर्मचारी संघटित झाल्याशिवाय हा प्रश्न कदापि सुटू शकणार नाही. मागच्या पाच दशकांहून अधिक काळापासून तुटपुंज्या मानधनावर काम करणाऱ्या या

### महाराष्ट्र राज्य सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेच्या वतीने माजी मंत्री मुनगंटीवार करणार नेतृत्व

कर्मचाऱ्यांना जगण्यासाठी किमान वेतन तरी मिळणे आवश्यक आहे, ही बाब या क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या विविध संघटनांच्या पदाधिकाऱ्यांच्या लक्षातही न आल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

आपली संघटना कोणाच्याही विरोधात काम करत नाही. वर्षानुवर्षे अर्धपोटी असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पोटभर खायला मिळावे, सन्मानाने जगता यावे यासाठीच हा लढा आहे. या मागण्या जर कोणाला चुकीच्या वाटत असतील तर त्यांनी कृपया पुढे येऊन स्पष्ट सांगावे, असे मतही बेडगे यांनी व्यक्त केले. आपल्या शेजारच्या कर्नाटक राज्यातील सरकार सार्वजनिक ग्रंथालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना ३६ हजार उपाये एवढे वेतन देते. किमान कर्नाटकात मिळणाऱ्या वेतानाएवढे तरी वेतन महाराष्ट्रातील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना मिळाले पाहिजे.

माजी मंत्री सुधीरभाऊ मुनगंटीवार, आ. अभिजित वंजारी यांच्या प्रमुख नेतृत्वाखाली नागपूरच्या यशवंत स्टेडिअमपासून दि. ११ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता हा मोर्चा निघणार आहे. मोर्चात सहभागी होणाऱ्या कर्मचाऱ्यांची सर्व व्यवस्था अमृत भवन, विद्यापिठ लायब्ररी जवळ अंबाझरी रोड, नागपूर येथे करण्यात आली आहे, असेही सदाशिव बेडगे यांनी सांगितले.

यावेळी बालाजी कांगणे, विद्यासागर हणमंते, मनोहर गायकवाड, निळकंठ होनमोडे, श्रीधर स्वामी यांनीही आपले विचार व्यक्त केले. जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील अध्यक्ष-पदाधिकाऱ्यांनी आपआपल्या तालुक्यातून मोर्चासाठी येणाऱ्या कर्मचाऱ्यांची माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संतोष करमले यांनी तर आभार प्रदर्शन सूर्यकांत जाधव यांनी केले.

यावेळी लातूर तालुका ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेची कार्यकारिणी घोषित करण्यात आली. यामध्ये तालुका अध्यक्ष शरद धाबेकर, उपाध्यक्ष सुधीर जोशी, सौ.अस्मिता अजनीकर, कार्याध्यक्ष चंद्रकांत माने तर सचिव दगडू गरड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

नूतन पदाधिकाऱ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या बैठकीस उदगीर तालुका अध्यक्ष सूर्यकांत जगताप, औसा गिरीधर जंगाले, निलंगा सतीश माकणे, जळकोट यशवंत कुलकर्णी, देवणी शिवहार बिराजदार, चाकूर किशोरचंद देशमाने, अहमदपूर चंद्रकांत पौळ, रेणापूर नागनाथ नागरगोजे, शिरूर अनंतपाळ काशिनाथ बोडके यांसह अनेक कर्मचारी उपस्थित होते.

## 'व्हीएस पँथर्स'चे धरणे आंदोलन

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** लातूर शहरातील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील एमआरआय मशीन बंद असल्याने सर्वसामान्य रुग्णांची अडचण होत आहे. ही मशीन त्वरित चालू करावी, या मागणीसाठी व्हीएस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने शासकीय रुग्णालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले.

विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील एमआरआय मशीन मागच्या अनेक महिन्यांपासून बंद आहे. याबाबत सामान्य रुग्णांची हेळसांड होत असल्याची तक्रार व्हीएस पँथर्स युवा संघटनेच आस्थापक अध्यक्ष विनोद खटके, प्रदेशाध्यक्ष तथा माजी नगरसेवक सचिन मस्के यांच्याकडे अनेक गरीब रुग्णांनी केली होती. रुग्णांना न्याय देण्यासाठी विनोद खटके यांच्या सूचनेवरून संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी शासकीय रुग्णालयासमोर हे धरणे आंदोलन केले.

या आंदोलनात संघटनेचे संपर्क प्रमुख आनंद जाधव, जिल्हाध्यक्ष शरद किनीकर, देवा गायकवाड, आबासाहेब गायकवाड, कुलदीप कांबळे, असद शेख, शाहरुख मणियार, अजय वाघमारे, सिध्यर्थ किनीकर, प्रशांत सातपुते, विलास कसबे, जगदीश सरवदे, विशाल गवळी, पप्पू सोनवणे, समाधान गायकवाड, बापू सरवदे, दिलीप सूर्यवनशी, रमेश पुणेकर, रणजित कांबळे, नागनाथ कांबळे, अतुल गायकवाड, अतिश टेंकाळे, रमाकांत कुडके, प्रदीप गायकवाड, राजू पठाण, समीर शेख, इब्राहिम शेख आदी कार्यकर्ते-पदाधिकारी सहभागी झाले होते.

## प्रा. डॉ. संजय मंडगे यांचा सेवानिवृत्तीबद्दल सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागात संत गाडगेबाबा महाविद्यालय, लोहा जि. नांदेड येथील नुकतच सेवानिवृत्त झालेले वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख प्रोफेसर डॉ. संजय मंडगे यांचा एस.आर.टी प्राध्यापक संघटनेचे नेते डॉ. दिपक चाटे यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ. रोहीत कदम, डॉ. सोपान ढवळे, डॉ. सी. एस. स्वामी, डॉ. राहुल अलापूरे, डॉ. सुधाकर चाटे, डॉ. विनय नागपुरणे, डॉ. शंकर यादव, डॉ. संजय गवई आणि डॉ. गुणवंत बिरादार यांची उपस्थिती होती.

प्रोफेसर डॉ. संजय मंडगे हे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड अंतर्गत येणाऱ्या संत गाडगेबाबा



महाविद्यालय, लोहा जि. नांदेड येथे सन १९८९ पासून कार्यरत असून त्यांनी वनस्पतीशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून अत्यंत महत्त्वपूर्ण काम केले आहे. त्यांनी आपल्या संपूर्ण शैक्षणिक कारकिर्दीमध्ये तब्बल ३६ वर्ष विद्यार्थ्यांची शैक्षणिक सेवा केली आहे. विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अभ्यास मंडळावर सदस्य, कॅस समिती सदस्य, सलग्निकरण समिती सदस्य अशा विविध महत्त्वपूर्ण समित्यावर कार्य केले आहे. ते मूळचे लातूर जिल्ह्यातील उदगीर येथील असून त्यांची मुलं-मुली उच्चस्थ पदावर सध्या कार्यरत आहेत.

यावेळी सत्काराला उत्तर देताना प्रोफेसर डॉ. संजय मंडगे म्हणाले की, आज महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयातील वनस्पतीशास्त्र विभागामध्ये वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. दीपक चाटे यांनी पुढाकार घेऊन लातूर जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयाचे वनस्पतीशास्त्र विभागाचे प्राध्यापक यांनी एकत्रितपाने माझा सन्मान केला त्याबद्दल मी सर्वांचा ऋणी आहे असे सांगून यापुढेही आपणास माझी काही मदत लागल्यास मी ती आवश्यक करेल तसेच. आपले प्रेम आणि सहकार्य सदोदित माझ्यासोबत राहील अशी अपेक्षाही त्यांनी यावेळी व्यक्त केली.

त्यांच्या या सेवानिवृत्तीबद्दल महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. आनंद शेवाळे, मुख्य समन्वयक डॉ. भास्कररेड्डी नल्ला, माजी प्रभारी प्राचार्य प्रो. डॉ. संजय गवई आणि डॉ. गुणवंत बिरादार यांनी त्यांना पुढील आयुष्य निरोगी आणि सुख समृद्ध राहण्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत.

# यशवंत वेणू पुरस्कार मिळाल्याबद्दल कव्हेकर दाम्पत्यांचा सत्कार

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** देशात व राज्यामध्ये प्रतिष्ठेचा समजला जाणारा यशवंराव चव्हाण प्रतिष्ठान, पुणेचा यशवंत वेणू राज्यस्तरीय पुरस्कार अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस व नांदेड विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ.पंडित विद्यासागर, पद्मश्री गिरीष प्रभूणे यांच्याहस्ते पुणे येथील ॲटो क्लस्टर सभागृहात माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांना नुकताच प्रदान करण्यात आला. त्याबद्दल लातूर येथील विविध क्षेत्रातील मान्यवरांच्यावतीने



त्यांचा सत्कार करण्यात आला.

यामध्ये भारत शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव प्रा.गोविंदराव घार, नाशिक विद्यापीठाचे प्र.कुलगुरू जोगेंद्रसिंह बिसेन, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, हरंगुळ (बु) येथील बाबुराव पाटील, कमलाकर कदम, प्राचार्य डॉ.आर.एस.अवस्थी, शिवाजी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सतीश यादव, नगरसेविका रागिणीताई यादव, माजी नगरसेविका केशरबाई महापुरे, प्रा. शंकर यादव, सरदार शेख, प्रा.डॉ.श्रध्दा अवस्थी, डॉ.एम.आर. पाटील, शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष मच्छिंद्र गुरमे, मुख्याध्यापिका अरूणाताई कांदे, राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त डॉ. शोभा माने, डॉ.अनिता खडके, डॉ.स्मिता मामिलवार, प्रा.डॉ. संगिता गोविंदराव घार, ॲड. आगरकर आदींनी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर व लातूर जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ.प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. तसेच त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## दिड लाख लातूरकरांतून आढळले १० नवे कुष्ठरुग्ण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, २ डिसेंबर :** लातूर शहरातील एकूण २९ हजार ८१५ घरांमधून १लाख ३८ हजार ६२३ नागरिकांची तपासणी करून महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या कुष्ठरोग शोध मोहिमेत एकूण १० नवे कुष्ठरुग्ण आढळून आल्याची माहिती मनपाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. शंकर भारती यांनी दिली.

एकूण नागरिकांच्या तपासणीनंतर त्यामध्ये १ हजार १३३ व्यक्ती कुष्ठरोग संशयित आढळून आले. त्यातील ९१३ जणांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केल्यानंतर १० जणांना कुष्ठरोग असल्याचे निदन झाल्याचे डॉ. भारती यांनी सांगितले. देशातून कुष्टरोगाला हद्दपार करण्याची मोहीम सुरु असून त्या अनुषंगाने लातूर शहरही कुष्ठरोगमुक्त करण्याच्या उद्देशाने मनपाच्या आरोग्य विभागाच्या वतीने १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर दरम्यान कुष्ठरुग्ण शोध मोहीम राबविण्यात आली.

त्याकरिता मनपाचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, शहरातील आशा सेविका यांच्या १६० जणांच्या टीमने घरोघरी जाऊन रुग्णांची तपासणी केली.

लातूर शहर मनपाच्या आयुक्त श्रीमती मानसी मीना यांच्या मार्गदर्शनात उपायुक्त वसुधा फड यांच्या सूचनेवरून सदर मोहीम राबविण्यात आली. याकामी मनपाच्या साथरोग अधिकारी डॉ. स्वाती मजगे, आरोग्य निरीक्षक पार्श्वनाथ पाटील, कुष्टरोगविभागाचे सुपरवायझर शिवाजी फले यासह आरोग्य विभागाच्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## थोडक्यात...



**छत्रपती संभाजीनगर :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पंचायत समिती व नगरपरिषद निवडणुकीसंदर्भात छत्रपती संभाजीनगर दौऱ्यावर आले. या वेळी बीजेपी युवा नेते राजू शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले.

### टोयोटा किर्लोस्कर मोटरने नोव्हेंबर २०२५ मध्ये ३३,७५२ युनिट्सची विक्री केली

**छत्रपती संभाजीनगर :** टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज नोव्हेंबर २०२५ साठी आपल्या विक्री कामगिरीची घोषणा केली, जेथे एकूण ३३,७५२ युनिट्सच्या विक्रीची नोंद केली आहे. यामध्ये देशांतर्गत बाजारपेठेत विक्री करण्यात आलेल्या ३०,०८५ युनिट्सचा समावेश आहे, तर ३,६६७ युनिट्स निर्यात करण्यात आल्या.''सकारात्मक सणासुदीचा काळ, तसेच सरकारने जीएसटीमध्ये केलेल्या सुधारणांमुळे आम्हाला विक्रीमध्ये २८ टक्क्यांच्या वाढीसह चांगली गती दिसत आहे. नुकतेच लाँच करण्यात आलेल्या अर्बन क्रूझर हायराइडर ऐरो एडिशन आणि फॉर्च्युनर लीडर एडिशन देखील आम्हाला ही गतीशील वाढ अधिक दृढ करण्यास मदत करत आहेत, जेथे देशभरात या वेईकल्सना मोठ्या प्रमाणात पसंती मिळत आहे. ड्रम टाओ सारखे नाविन्यपूर्ण उपक्रम आणि बेंगळुरूमध्ये लाँच करण्यात आलेल्या टोयोटा एक्स्पीरिन्शियल म्युझियम (टीईएम)चे मोठ्या प्रमाणात कौतुक करण्यात आले आहे, ज्यासह ग्राहक सहभाग आणि ब्रँड संबंध अधिक दृढ होत आहेत, अशी माहिती सेल्स-सर्विस-युज्ड कार बिझनेसचे उपाध्यक्ष वरिंदर वाधवा यांनी दिली.

### हिंदुस्तान झिंकची जागतिक प्रतिष्ठा वाढवली

**मुंबई :** भारतातील एकमेव आणि जगातील सर्वात मोठी एकात्मिक झिंक उत्पादक, हिंदुस्तान झिंक लिमिटेडने आज आंतरराष्ट्रीय खाण आणि धातू परिषदेतील सदस्यत्वाचे धोरणात्मक महत्त्व पुन्हा एकदा स्पष्ट केले. आयसीएमएम च्या २६ जागतिक खाण आणि धातू नेत्यांच्या निवडक गटातील एकमेव भारतीय कंपनी म्हणून, हिंदुस्तान झिंक भारताला जबाबदार खनिज विकासावरील आंतरराष्ट्रीय संवादाच्या सर्वोच्च स्तरावर थेट आणते. हा विकास अशा महत्त्वपूर्ण वेळी झाला आहे जेव्हा रिन्यूएबल एनर्जी सिस्टमए ग्रीन इंफ्रास्ट्रक्चरए इलेक्ट्रिक मोबिलिटी आणि एडवांस्ड डिजिटल टेक्नोलॉजी विस्तार झिंक आणि चांदीसारख्या आवश्यक खनिजांची जागतिक मागणी वाढवत आहे. भारत अत्यावश्यक खनिजांसाठी एका महत्त्वाच्या दशकात प्रवेश करत असताना, जबाबदार खाणकामासाठी बेंचमार्क स्थापित करणाऱ्या देशाच्या जागतिक दृष्टिकोनाला पाठिंबा देण्याचा हिंदुस्तान झिंकला अभिमान आहे. आयसीएमएमसोबतची आमची भागीदारी या महत्त्वाच्या खनिज युगात भारताच्या प्रगतीला गती देईल आणि सस्टेनेबल ऑपरेशन्स आणि देशाच्या स्वच्छ ऊर्जा संक्रमणासाठी आमची वचनबद्धता आणखी मजबूत करेल, असे हिंदुस्तान झिंकच्या अध्यक्षा प्रिया अग्रवाल म्हणाल्या.

### ६९ वर्षीय आजीकडून किडनी दान

**अहिल्यानगर :** पुण्यातील खराडी येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी अंतिम टप्प्यातील किडनी आजाराने पीडित असलेल्या ९ वर्षीय मुलीवर जिवंत दात्याचे किडनी प्रत्यारोपण यशस्वीरित्या केले आहे. या दुर्मिळ व यशस्वी केसमध्ये या मुलीला तिच्या ६९ वर्षीय आजीकडून किडनी मिळाली, ज्यामधून दिसून येते की, मुलांमध्ये प्रत्यारोपण करताना वय आणि कौटुंबिक नात्याचा विचार केला जाऊ शकतो.९ वर्षीय सक्रिय व हुशार मुलीला सौम्य स्वरूपाचा ताप, अशक्तपणा व खोकला या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. बालरोगतज्ज्ञांकडून पुढील उपचार व चाचणीमधून फक्त ३ स/वश्र ची अत्यंत कमी हिमोग्लोबिन पातळी असल्याचे निदर्शनास आले. पुढील तपासण्यांमधून किडनी कार्यावर गंभीर परिणामाची पुष्टी झाली आणि इमेजिंगमधून दिसून आले की दोन्ही किडन्या अत्यंत लहान होत्या आणि आकुंचन पावल्या होत्या. यामधून गंभीर किडनीच्या आजाराचे निदान झाले, ज्याकडे मूत्रमार्गात लक्षणे दिसून न आल्याने दुर्लक्ष झाले होते. हे निदान कुटुंबासाठी धक्कादायक ठरले. किडनी प्रत्यारोपणाच्या गरजेने त्यांच्या दु:खामध्ये अधिक भर केली. या आव्हानात्मक काळामध्ये या लहान मुलीने उल्लेखनीय धाडस दाखवले, तिच्या ६९ वर्षीय आजीने स्वत:ची किडनी दान करण्याचा निर्णय घेत अधिक मोठे धैर्य दाखवले.

### राष्ट्रीय लोकअदालत दि.१३ रोजी

**छत्रपती संभाजीनगर :** कौटुंबिक न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांची राष्ट्रीय लोकदालत शनिवार दि.१३ रोजी होणार आहे. ही लोकअदालत कौटुंबिक न्यायालय इमारतीत सकाळी साडेदहा वा. होणार आहे, असे कौटुंबिक न्यायालयाचे प्रबंधक यांनी कळविले आहे.

### क्षेत्र गोलटगाव येथे फिरत्या नारळी अखंड हरिनाम सप्ताहचे आयोजन



**खुलताबाद, दि. २ डिसेंबर :** खुलताबाद प्रतिनिधी श्री क्षेत्र वेरूळ नाथ आश्रम , प्रमुख गुरुवर्य अक्का महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री क्षेत्र,गोलटगाव येथे दि १/१२/२०२५ रोजी या वर्षी च्या ४१ वा फिरता अखंड हरिनाम सप्ताह ची, हजारो भाविक भक्तांच्या उपस्थितीत सुरुवात, गोलटगाव फाट्यापासून महाराजा सह भाविक भक्तांची मिरवणूक गावात सडा रांगोळ्या फुलांची पुष्परोष्टी करून भव्यप्रकारे स्वागत करण्यात आले.श्री क्षेत्र गोलटगाव ता जि. छत्रपती संभाजी नगर या ठिकाणी दिनांक १/१२/२०२५ वर सोमवारपासून पाच दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताहाची कीर्तनाची पहिल्या दिवसाची सेवा सेवानिवृत्त उपउपजिल्हाधिकारी , ह भ प विजयकुमार फड यांचे होणारा असून या ठिकाणी महाराष्ट्रातील प्रख्यात कीर्तनकार. कीर्तनाचे दररोज सायंकाळी, आयोजन करण्यात आले आहे.

# राममंदिर झाले, आता राष्ट्रमंदिराची उभारणी

## ■ सरसंघचालक डॉ. मोहन भागवत; आदित्य प्रतिष्ठानच्या वतीने कृतज्ञता पुरस्कार








**पुणे :** विश्वकल्याणाची पताका फडकविणारे श्रीराममंदिर उभे राहिले. आता पूर्वीपेक्षा अधिक भव्य, सामर्थ्यसंपन्न आणि सुंदर राष्ट्रमंदिर उभे करायचे आहे, असा विश्वास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केला.

कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आयोजित, आदित्य प्रतिष्ठान प्रस्तुत राष्ट्रीय स्वयंसेवक संघ शताब्दी वर्षानिमित्त कृतज्ञता सोहळ्यात सरसंघचालक बोलत होते. यावेळी कांचीकामकोटी पीठाचे जगद्गुरू शंकराचार्य विजयेंद्र सरस्वती स्वामी, आदित्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष शंकर अभ्यंकर, अपर्णा अभ्यंकर उपस्थित होते. आपल्याच समाजाचे कार्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघात उपकाराची अथवा अहंकाराची भावना नाही, असे मत कृतज्ञता पुरस्कार स्वीकारताना सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. ते म्हणाले, संघाला संपूर्ण समाजाचे संघटन अभिप्रेत आहे. कारण समाज संघटित झाला तरच राष्ट्र वैभवसंपन्न होईल. राष्ट्र बलसंपन्न झाले तरच विश्र्वाला सुखशांती लाभेल. यातही देशाचे कल्याण संघच करेल, अशी आमची वल्गना नाही. तर समाज उभा राहिला तरच देश उभा राहील. कठीण काळामध्ये समाजानेच संघाला साथ दिली, म्हणून संघ मोठा झाल्याचेही सरसंघचालक म्हणाले.

**स्वयंसेवकांनी प्राण ओतून संघ उभा केला**

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, रक्ताचे पाणी करत स्वतः बीज बनत, संपूर्ण आयुष्य मातीत मिसळून संघाचा वटवृक्ष उभे करणारे डॉ. हेडगेवार, राष्ट्रासाठी आपले जीवन ओवाळून टाकणारे प्रचारक, ग्रामीण व दुर्गम भागात जीव धोक्यात टाकून कार्य करणारे गृहस्थी कार्यकर्ते आणि अक्षरशः प्राण ओतून संघ उभा करणाऱ्या स्वयंसेवकांप्रती ही कृतज्ञता व्यक्त करायला हवी, असे मत सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी व्यक्त केले. पराकोटीचे हाल, उपेक्षा सोसूनही स्वयंसेवक हसतमुखाने कार्य करतो. विश्र्वकल्याणाची भावना असलेल्या या संघशक्तीतून समाजाला कधीही उपद्रव होणार नाही, असेही सरसंघचालक म्हणाले.

शंकर अभ्यंकर म्हणाले, आक्रमणांमुळे जगातील अनेक संस्कृती नष्ट झाल्या. मात्र संपूर्ण वसुंधरेलाच कुटुंब मानणारी भारताची हिंदू संस्कृती आजही टिकून आहे. भौतिक आक्रमणांबरोबरच आंतरिक आक्रमणही भारतावर झाले. ब्रिटिशांनी भारताचा 'स्व' मोडण्याचा प्रयत्न केला.

भारताची सनातन संस्कृती ही विश्वकल्याणासाठी मानवतेला मार्गदर्शक असून, हिंदू संस्कृतीच सर्वांचा स्वीकार करते, असे मत शंकराचार्यांनी व्यक्त केले. ते पुढे म्हणाले, अनेक भाषा, परंपरा, प्रांत असतानाही भारतात आधुनिक लोकशाही यशस्वी झाली आहे. कारण प्रजातंत्र हा सनातन धर्माचा भावच आहे. आज लोकशाहीला सामर्थ्यशाली करण्याची गरज असून, चांगल्या लोकांना बळ दिले पाहिजे. कार्यक्रमात वैश्विक संत भारती महाविष्णू मंदिराच्या कोनशिलेचे अनावरण, 'भारतीय उपासना' या विश्वकोष खंडाच्या तिसऱ्या आवृत्तीचे आणि जितेंद्र अभ्यंकर कृत 'पंढरीश' या ध्वनिफितीचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात रामायणावर आधारित 'निरंतर' या संगीत नाटिकेने झाली. सूत्रसंचालन डॉ. आदित्य अभ्यंकर यांनी केले. जितेंद्र अभ्यंकर यांनी संपूर्ण वंदे मातरम सादर केले.

## छत्रपती संभाजीनगरमध्ये ५ डिसेंबरला आक्रोश मोर्चा



**छत्रपती संभाजीनगर, दि. २ डिसेंबर :** नाशिक जिल्ह्यातील मालेगाव-डोंगराळे येथे कु. यज्ञा दुसाने हिच्यावर झालेल्या बलात्कार आणि निर्घृण खुनाच्या घटनेविरोधात संताप व्यक्त करत, सकल सोनार समाज व इतर सर्वधर्म समाजाच्या वतीने ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजता क्रांती चौक ते आयुक्त कार्यालयदरम्यान आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाने संबंधित आरोपीला तत्काळ फाशीची शिक्षा देण्याची ठाम मागणी केली आहे.

पत्रकारांशी बोलताना समाज प्रतिनिधींनी सांगितले की या प्रकरणाची सुनावणी फास्टट्रॅक न्यायालयात चालवावी, यासाठी पालकमंत्र्यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन देण्यात येणार आहे. तसेच मराठा आरक्षण योद्धे मनोज जरांगे पाटील यांची भेट घेऊन मराठा समाजालाही या मोर्चात सहभागी होण्याची विनंती करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. समाज प्रतिनिधींनी स्पष्ट केले की, आमच्या मोर्च्याचा उद्देश सरकार व संबंधित अधिकाऱ्यांचे

**कु. यज्ञा दुसाने प्रकरणातील आरोपीला फाशीची मागणी**


लक्ष वेधून आरोपीस लवकरात लवकर फाशीची शिक्षा व्हावी, हा आहे.

या नियोजनावेळी मनोहर इखनकर, प्रमोद टेहरे, आदिल दहिवळ, अनिल सोनवणे, मधुकर रांजणगावकर, गणेश दुसाने, किशोर दुसाने, निखिल कुलथे, ॲड. नवीन कुमार, शुभम अधिकार, मच्छिंद्र नागरे आदी उपस्थित होते.

## महात्मा गांधी मराठवाडा भूषण पुरस्काराचे शुक्रवारी वितरण







**छत्रपती संभाजीनगर, दि. २ डिसेंबर :** मराठवाड्याच्या विविध क्षेत्रातील योगदानाबद्दल महात्मा गांधी मिशनच्या वतीने 'महात्मा गांधी मराठवाडा भूषण सन्मान' प्रदान करण्याचा उपक्रम गेल्या चार वर्षांपासून सुरु करण्यात आला आहे. २०२५ वर्षाचा 'महात्मा गांधी मराठवाडा भूषण' सन्मान वितरण सोहळा शुक्रवार, दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ विचारवंत कुमार केतकर यांच्या प्रमख उपस्थितीत रुक्मिणी सभागृह येथे संपन्न होणार आहे.

महात्मा गांधी मराठवाडा भूषण सन्मानात प्रत्येकी रोख रुपये ५० हजार आणि स्मृती चिन्हाचा समावेश आहे. निवड समितीचे अध्यक्ष आणि महात्मा गांधी मिशनचे सचिव अंकुशराव कदम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या निवड समितीच्या बैठकीत २०२५ वर्षीच्या सन्मानार्थींची एकमताने निवड करण्यात आली. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते डॉ.भालचंद्र कांगो यांना सेवा क्षेत्र आणि डॉ.प्रभाकर देव यांनी सांस्कृतिक क्षेत्रात त्यांनी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल २०२५ सालचा 'महात्मा गांधी मराठवाडा भूषण' सन्मान जाहीर करण्यात आलेला आहे.

या कार्यक्रमास एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, निवड समितीचे अध्यक्ष अंकुशराव कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित असणार आहेत. या कार्यक्रमास सर्वांना खुला प्रवेश असून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## जरंडीमध्ये पहिले प्लास्टिक निर्मूलन केंद्र सुरू होणार!




**सोयगाव, दि.१ डिसेंबर :** तालुक्यात पर्यावरणपूरक उपक्रमांना बळ देणारे आणि स्वच्छता उपक्रमांना नवा आयाम देणारे सोयगाव तालुक्यातील पहिले प्लास्टिक कचरा निर्मूलन व पुनर्वापर केंद्र जरंडी ग्रामपंचायतीमध्ये सुरू होणार आहे.स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ अंतर्गत जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन,जिल्हा परिषद यांना याबाबत जरंडी ग्रामपंचायतीने प्रस्ताव पाठविला असून यांची अधिकृत मान्यता मिळाल्यानंतर अत्याधुनिक मशिनरीसह हा प्रकल्प कार्यरत येईल असे ग्रामपंचायत अधिकारी सुनिल मंगरुळे यांनी सांगितले आहे.

सोमवार, (दि. १९) नोव्हेंबर रोजी गटविकास अधिकारी शिवाजी यमूलवाड यांनी केंद्रच्या प्रस्तावित जागेची पाहणी केली.यावेळी बोलताना ते म्हणाले,तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमधून जमा होणारा प्लास्टिक कचरा येथे वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया करून पुनर्वापरासाठी तयार केला जाणार आहे.

यमूलवाड यांनी पुढे सांगितले की, या प्रकल्पामुळे केवळ तालुक्यातील प्लास्टिक कचरा व्यवस्थापन सुलभहोणार नाही तर जरंडी ग्रामपंचायतीच्या उत्पन्नातही वाढ होणार आहे. पाहणीवेळी सरपंच स्वातीताई पाटील,उपसरपंच संजय पाटील,वंदनाताई पाटील,मधुकर सोनवणे,मधुकर पाटील,विस्तार अधिकारी (पंचायत) अशोक दौड,विष्णू वाघ,कर्मचारी संतोष पाटील,सतिष बाविस्कर, आदी उपस्थित होते.

## कापूस, सोयाबीनची हमी भावाने विक्री

**छत्रपती संभाजीनगर, दि.१:** हंगाम सन २०२५-२६ मध्ये हमीभावाने कापूस व सोयाबीन, मका विक्री करण्यासाठी भारतीय कापूस निगम लिमिटेड यांनी कापूस उत्पादक शेतकऱ्यांना पूर्व नोंदणी करण्यासाठी कापूस किसान मोबाइल ॲप्लिकेशन सुविधा उपलब्ध करून दिली आहे. तर सोयाबीन विक्रीसाठी ई समृद्धीवर तर मका करीता स्वतंत्र लिंकवर नोंदणीची सुविधा उपलब्ध असून शेतकऱ्यांनी नोंदणीसाठी प सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले आहे. शेतकऱ्यांना आपला कापूस, सोयाबीन ही पिके हमी भावाने विकता यावी यासाठी ही सुविधा शासनाने उपलब्ध करुन दिली आहे.

## लोकशाही दिनी १८ अर्ज

**छत्रपती संभाजीनगर, दि.१ :** जिल्हास्तरीय लोकशाही दिन आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजीत करण्यात आला. यावेळी नागरिकांकडून १८तक्रारी अर्ज प्राप्त झाले. विभागनिहाय प्राप्त अर्ज याप्रमाणे - जिल्हा परिषद २, इतर निवेदन १६ याप्रमाणे एकूण १८ अर्ज प्राप्त झाले, असे सामान्य शाखेच्या उपजिल्हाधिकारी श्रीमती संगिता राठोड यांनी कळविले आहे.

## जागतिक एड्स दिन विविध उपकमांनी साजरा

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा रुग्णालयाच्या वतीने जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृतीपर विविध उपक्रम राबविण्यात आले. दि.१५ पर्यंत विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत, असे जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांनी कळविले आहे. जिल्हा रुग्णालयात आज सकाळी सायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत जिल्हा सायकल संघटना, तेज्स्विनी सायकल क्लब, देवगिरी सायकलिंग क्लब आदी संस्था सहभागी झाल्या. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कमलाकर मुदखेडकर यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून सायकल रॅली मार्गस्थ करण्यात आली. अतिरिक्त जिल्हा शक्य चिकित्सक डॉ. भुषणकुमार रामटेके, डॉ. नारायण सावरगावेकर, डॉ. अनुपम टाकळकर, डॉ. पद्मजा सराफ, डॉ.प्रशांत बडे, डॉ. अपर्णा जक्कल, डॉ. मनिष भोंडवे, डॉ. एम.टी.साळवे, डॉ. पंडीत किल्लारीकर, डॉ. दीपमाला परदेशी, श्रीमती साधना गंगावणे, संजय पवार, विनोद मस्के, पंकज धुळे आदी उपस्थित होते.

**ANGEL ONE LIMITED**

Regd. Off: 601, 6th Floor, ACKRUTI STAR, CENTRAL ROAD, MIDC, ANDHERI EAST, MUMBAI -400093
Centralized desk : 18001020 Email id : support@angelone.in
Member of : NSE / BSE / BSE REMISIER / MCX / MCX SX / NCDEX
Member IDs: NSE : 12798, BSE : 612, MCX : 12685,
NCDEX : 00220 SEBI Registration No: INZ000161534

**NOTICE**

This is to inform all concerned that we have initiated the process of cancellation of registration of our below mentioned Authorised Person (AP) due to regulatory reasons/concerns.

| Name Of Authorised Person | Trade Name of AP | Address of AP | AP Registration No. |
|---|---|---|---|
| ANANDA LAXMAN PADGHANE | ANANDA LAXMAN PADGHANE | S/O LAXMAN PADGHANE, ANNA BHAU SAATHE SAMAJ MANDIR PARISARAT, POST, TQ, HADGAON, DIST NANDED, HADGAON, NANDED,431712 MAHARASHTRA | NSE : AP0397633331 MCX : MCX/AP/174958 |

Any person dealing with the above-mentioned Authorised Person henceforth shall do so at their own risk. **ANGEL ONE LTD.** shall not be liable for any dealings with the said entity post the issuance of this notice. Investors having any queries or concerns regarding this matter are requested to contact **ANGEL ONE LTD.** within **15 days** from the date of issuing this notice.

**Date : 03.12.2025**
**Place : Maharashtra**

**For ANGEL ONE LTD**
**Sd/-, Authorised Signatory**

**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव**

**तालुका व जिल्हा धाराशिव**

**email id:- osdvmcollege@gmail.com**

जा.क्र. ई-निविदा/०२/२०२५-२६ **जाहीर ई-निविदा सुचना क्र. ०२/२०२५-२६** दिनांक ०१/१२/२०२५

**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव (जि. धाराशिव)** यांनी नोंदणीकृत व मान्यताप्राप्त ठेकेदार/पुरवठादार यांच्याकडून व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांना **प्रयोगशाळा उपकरणे पुरवठा करण्यासाठी** दोन लिफाफा पद्धतीने ई-निविदा मागविण्यात येत आहेत. तरी इच्छुकांनी आपली निविदा **०३/१२/२०२५ ते १०/१२/२०२५ रोजी सायं. १८:५५** या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने सादर करावी. **निविदापूर्व बैठक दिनांक ०६/१२/२०२५ सकाळी ११:०० वाजता व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. उपरोक्त ई-निविदा फॉर्म विक्री व स्वीकृतीची संपूर्ण कार्यवाही वरील कालावधीत http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर करण्यात येत आहे.

तरी सर्व निविदाधारकांनी विहित वेळेत आपला तांत्रिक लिफाफा ऑनलाइन (online) पद्धतीने सादर करावा. अधिक माहितीसाठी उपरोक्त संकेतस्थळावर व ०१२०-४२००४६२, ०१२०-४००१००२, ०१२०-४००१००५, ०१२०-६२७७७८७ या टोल-फ्री क्रमांकांवर संपर्क साधावा.

**अटी व शर्ती :**

१. कोणतीही एक किंवा सर्व निविदा **कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार** प्राचार्य, व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव यांनी राखून ठेवलेला आहे.
२. निविदाधारकांनी निविदा रक्कम व सुरक्षा ठेव रक्कम Net Banking द्वारे On-line सादर करावी.

स्वाक्षरित/-
**प्राचार्य,**
**व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, धाराशिव**

## अग्रलेख...

# केल्याने तीर्थाटन

भौतिक समाधानासाठी आवश्यक असलेल्या गरजांची पूर्तता झाली की, आपण ज्या समाधानाच्या शोधात होतो ते समाधान हे नाही याची जाणीव कदाचित होत असावी. बहुधा, भौतिक सुखाच्या आणि समाधानाच्या आजपर्यंतच्या कल्पनांचा पूर्ण उपभोग घेऊनही सुखाचा आणि समाधानाचा तो शोध संपलेला नसावा. तसे नसते, तर पर्यटनाच्या पारंपरिक प्रथांमध्ये परिवर्तन होऊ लागले नसते. 'केल्याने देशाटन' हा पर्यटनाचा पारंपरिक बाज आपल्या देशात तसा जुनाच आहे. या पर्यटनाच्या कल्पना मात्र जुन्या काळात वेगळ्या होत्या. अशा पर्यटनातून वेगवेगळ्या प्रांतातील पंडित, विद्वानांचा सहवास मिळतो, व्यक्तिमत्त्वाचा विकास होतो आणि व्यासंग वाढून विद्वत्ता समृद्ध होते ही पारंपरिक पर्यटनाची समजूत काळासोबत बदलत गेली आणि पर्यटनास सहलीचे स्वरूप प्राप्त होत गेले. प्रेक्षणीय स्थळांच्या सहली आणि त्या निमित्ताने होणारा बाजारहाट व त्यातून पुन्हा घरांचे स्वरूप समृद्ध करणाऱ्या वस्तूंची खरेदी असा पर्यटनाचा नवा बाज सुरू झाल्याने त्यास या क्षेत्रास उद्योगाचे स्वरूप प्राप्त होत गेले. एका अर्थाने, पर्यटन हा आर्थिक उन्नतीचा एक नवा पर्याय म्हणून उभारी घेत गेला असला, तरी सहली, मौजमजा आणि आर्थिक उलाढालीचा नवा मार्ग असेच त्याचे रूप राहिल्याने जुन्या काळातील पर्यटनाच्या किंवा देशाटनामागच्या कल्पना संकोचत गेल्या. पुढे पर्यटनाच्या नव्या कल्पनांस बळ देतील अशी नवी पर्यटनस्थळे नव्याने आकार घेऊ लागली, जुन्या, पठडीबाज पर्यटनस्थळांनी कात टाकली व नव्या जाणिवांसोबत जुळवून घेण्याचे प्रयत्न करून त्यानुसार स्वत:मध्ये तसे बदलही घडवून आणले. पर्यटनाचा उद्देशच जेव्हा बदलून जातो, तेव्हा त्यामागील व्यवहारदेखील बदलतात. नव्या व्यवहारांनुसार पर्यटनाच्या संकल्पनेत आर्थिक हितसंबंधांना प्राधान्य मिळाल्याने साहजिकच भौतिक सुखाच्या आणि विरंगुळ्याच्या शोधाचा नवा मार्ग म्हणूनच पर्यटन व्यवसायाची बरकत सुरू झाली. इतिहासाची पुनरावृत्ती होत असते असे म्हणतात. ते खरे आहे हे वारंवार सिद्धही झालेले आहे. अन्यथा, वेशभूषेपासून केशभूषेपर्यंतच्या अनेक परंपरा वेगळ्या स्वरूपात फॅशनच्या नावाने नव्या पिढीत रुजल्या नसत्या. पर्यटनाच्या नव्या व्यावहारिक विरंगुळ्यातून सुख, समाधानाचे शोध संपत नाहीत, विरंगुळ्याचे क्षणही वेचता येत नाहीत असे आता अनेकांच्या लक्षात येऊ लागले आहे. आता या क्षेत्राला नव्या वळणाची वाट सापडली असावी, पर्यटनक्षेत्राचे पूर्वीचे देशाटनाचे रूप बदलून सहली किंवा विरंगुळ्याचा मार्ग म्हणून वळण घेतलेल्या या क्षेत्राने पुन्हा जुन्या वाटांकडे मोहरा वळविण्याचे ठरविले असावे. त्याची काही चिन्हे आता दिसू लागली आहेत. समाजाची संस्कृती पिढीगणिक बदलत असते असे म्हटले जाते. नव्या पिढीसोबत रुजणाऱ्या नव्या संस्कृतीमुळे जुन्या पिढ्या उसासे टाकतात, 'आमच्या वेळी असे नव्हते' असे म्हणत बदलत्या संस्कृतीच्या नावाने खंतदेखील व्यक्त करत असतात, त्या पिढीला दिलासा मिळेल असे नवे चित्र पर्यटनाच्या क्षेत्रात उमटू लागल्याचे काही संकेत आता मिळू लागले आहेत. सहलींच्या किंवा प्रेक्षणीय स्थळांची जागा आता पुन्हा तीर्थक्षेत्रे घेऊ लागल्याचे चित्र नव्याने समोर येऊ लागले आहे.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पर्यटन क्षेत्राच्या भावी वळणाची ही नवी दिशा कदाचित याआधीच दिसू लागली असावी. राजे महाराजांच्या सामर्थ्यामुळे नव्हे, तर या देशातील तीर्थक्षेत्रांच्या वाटेवर उमटलेल्या संत-महंतांच्या पाऊलखुणांमुळे भारतासारखा खंडप्राय देश सांस्कृतिकदृष्ट्या एकसंध राहिला आहे, यावर विदेशी अभ्यासकांचेही एकमत आहे. भक्तीच्या धाग्याने व धार्मिकतेच्या भावनेने शाश्वत जीवनाच्या अर्थांचा शोध घेण्याचा ध्यास ही भारताची सांस्कृतिक परंपरा राहिली आहे आणि त्या ध्यासाच्या धाग्यानेच जनतेस प्रांतभेद, भाषाभेदाच्या दऱ्या बुजवून एकत्र राखले आहे. त्यामुळेच हा देश परकीय आक्रमकांच्या विध्वंसालाही पुरून उरला आणि देशाने आपली परंपरा जतन केली. संस्कृतीच्या या उपकारांची जाणीव पुन्हा समाजात जागी करण्याच्या हेतूने मोदी सरकारने विकासासोबत परंपरांच्या पुनरुज्जीवनाची मोहीम हातात घेतली आणि तार्थक्षेत्रांच्या विकासाचा कार्यक्रम सुरू केला. अयोध्येतील राम मंदिर, काशी विश्वेश्वराच्या नवनिर्माणाचा कार्यक्रम, गुजरातमधील सरदार पटेल यांचा स्टॅच्यू ऑफ युनिटी, अशा काही स्थळांच्या विकासातून पर्यटनक्षेत्रातील बदलाच्या नव्या वाटा निर्माण होत गेल्या. काशी विश्वेश्वराच्या कायापालटामुळे, केवळ तीर्थक्षेत्र असलेले हे ठिकाण आता पर्यटनक्षेत्रही ठरले आहे. सुधारलेले रस्ते, नियोजनबद्ध विकास यामुळे भाविकांच्या भक्तिभावना जाग्या होतात, तसेच प्रेक्षणीय काही पाहिल्याचा नवा आनंदही त्यासोबतच मिळू लागला आहे. केदारनाथ धामच्या विकासाची योजनाही पर्यटनाच्या नव्या वाटांना विस्तृत करण्यास साह्यभूत ठरणार आहे. विकास आणि संस्कृती संवर्धनाचे हे नवे प्रयोग हातात हात घालून सुरू असल्याने पर्यटनक्षेत्राच्या पठडीबाजपणाने कात टाकण्यास सुरुवात केली असून पर्यटनाची जागा तीर्थाटनाने घेतली तर नवल वाटू नये असा आश्चर्यकारक बदल दिसू लागला आहे. भारतातील पर्यटनक्षेत्राचा हा बदलता बाज देशातील पर्यटकांप्रमाणे विदेशी पर्यटकांसही भुरळ घालू लागला आहे. गेल्या काही वर्षांत भारतात पर्यटनासाठी येणाऱ्या विदेशी पर्यटकांची संख्या झपाट्याने वाढत आहेच, पण त्यांनादेखील पर्यटनसंस्कृतीतील हा नवा बदल खुणावत आहे. भारतातील प्रेक्षणीय स्थळांच्या त्यांच्या पसंतिक्रमात विविध धार्मिक स्थळे, तीर्थक्षेत्रे आणि अयोध्येतील राम मंदिरासारख्या नव्या यादीचीही भर पडली आहे. गेल्या दोन-तीन वर्षांत, विशेषतः कोविड महामारीनंतर जनजीवन पूर्वपदावर आल्यापासूनच्या काळात भारतास तब्बल सुमारे एक कोटी विदेशी पर्यटकांनी भेट दिली. यापैकी बहुसंख्य पर्यटकांची पावले भारतीय संस्कृतीची मानचिन्हे असलेल्या तीर्थक्षेत्रांकडेही वळलेली दिसतात. हा पर्यटनसंस्कृतीतील बदल किती चांगला, हे ठरविण्यासाठीचे नवे मापदंड याचे उत्तर सकारात्मकच देतात. पर्यटन हा उद्योग असेल, तर त्यातून आर्थिक उलाढालींचे नवे स्रोत तयार व्हावेत हीच प्राधान्याने अपेक्षा असते. समाजात रोजगाराच्या नव्या संधी, उत्पन्नाचे नवे स्रोत आणि पर्यायाने जीवनशैलीत होणारी सुधारणा हेच विकासाचे उद्दिष्ट असेल, तर तीर्थाटनांच्या नव्या प्रकारांतूनही ते साध्य झाल्याचे स्पष्ट झाले आहे. दर वर्षी ३१ डिसेंबर हा दिवस वर्षअखेरचा सोहळा म्हणून साजरा केला जातो. त्याच्या साजरेपणाच्या कल्पनांवरील बाह्य समजुतींचा पगडादेखील आता नव्या पर्यटनसंस्कृतीमुळे पुसला जात असल्याचे चित्र आहे. सणासुदीच्या काळातील पर्यटनाकडे वळणारी पावले आणि वर्षअखेरीसारख्या क्षणांचे साजरेपण यांमधील फरक आता पुसला जाऊ लागला आहे. उत्सवांचा काळ संपला की समाजाची पावले मौजमजेकडे वळतात हा आजवरचा पर्यटनक्षेत्राचा पठडीबाज अनुभवही आता बदलाच्या टप्प्यावर दाखल झाला आहे. कारण, आता भारतीय पर्यटकांची पावले वर्षअखेरीचा सोहळा साजरा करण्यासाठी किंवा ख्रिसमसची सुटी घालविण्यासाठी युरोप किंवा थायलंडसारख्या प्रेक्षणीय परदेशी पर्यटनांची वाट धरण्याऐवजी भारतातील तीर्थक्षेत्रांच्या सहलीकडे वळू लागली आहेत. अयोध्या, वाराणसी, ऋषीकेश, अमृतसरसारख्या तीर्थस्थळांवरील गर्दी यंदाच्या डिसेंबरचा अखेरच्या आठवड्यात नवा विक्रम प्रस्थापित करेल असा सहल आयोजकांचा अंदाज या बदलाचे संकेत देतो. गेल्या वर्षभरात जेन-झीच्या मानसिकतेचे अनेक नवे पैलू जगाच्या वेगवेगळ्या भागांतून दिसू लागले असताना, भारतातील 'जेन-झी'ला तीर्थस्थळांचे आकर्षण वाटू लागल्याचेही दिसू लागले आहे. तीर्थस्थळांची यात्रा करणाऱ्यांपैकी सुमारे १२ टक्के पर्यटक तरुण पिढीतील असल्याची ढोबळ आकडेवारी समोर येत आहे. गेल्या वर्षातील तीर्थयात्रींच्या तुलनेत ही टक्केवारी सुमारे १५ टक्क्यांनी अधिक आहे. त्यामुळे, भौतिक सुखाच्या उपभोगानंतरही समाधानाचा शोध संपलेला नसल्याचा व समाधानाच्या शोधात नव्या समाजाच्या आसुसलेपणाचा अंदाज या नव्या बदलातून येऊ शकतो. पर्यटनक्षेत्राला चालना मिळेल हा या नव्या बदलाचा फायदा आहेच, पण नव्या मानसिकतेचे दर्शन घडविणारा हा नवा बदल म्हणजे भविष्यात घडणाऱ्या इतिहासाच्या पुनरावृत्तीची चाहूल तर नसेल?

## आंतरराष्ट्रीय

# नेतान्याहू यांनी का टाळला भारत दौरा?

**प्रा. जयसिंग यादव**

इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्या कार्यालयाने इस्रायलचे भारत आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी असलेले संबंध खूप मजबूत आहेत, असे अलिकडे सांगितले. खरे तर याची उजळणी करण्याची काहीच गरज नव्हती; परंतु नेतान्याहू यांच्या कार्यालयाने 'एक्स'वर जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांची टीम भारतभेटीसाठी नव्या तारखेबाबत चर्चा करीत आहे. याचा अर्थ असा की, नेतान्याहू यांचा आगामी भारत दौरा पुढे ढकलला गेला आहे आणि नवी तारीख अद्याप निश्चित झालेली नाही. याचा दुसरा अर्थ असा की, मध्य पूर्वेत घेतलेल्या भूमिकेमुळे नेतान्याहू अनेकांच्या रडारवर आहेत आणि जीविताला धोका असल्याच्या भीतीतून तूर्त त्यांचा दौरा पुढे ढकलण्यात आला आहे. दुसरे एक कारण म्हणजे इस्रायलचे परपंरागत विरोधी असलेले रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन हेही नेमके याच काळात भारताच्या दौऱ्यावर येत आहेत. 'आय २४ न्यूज' या इस्रायली वृत्तवाहिनीने दिलेल्या माहितीनुसार नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव भारत दौरा रद्द केला आहे. तथापि, 'सुरक्षेच्या कारणास्तव' असा उल्लेख कुठेही अधिकृतपणे करण्यात आलेला नाही. या वृत्तवाहिनीचे राजनयिक प्रतिनिधी गाय अझिएल यांनी लिहिले आहे की, नेतान्याहू यांची भारतभेट सुरक्षेच्या कारणास्तव पुढे ढकलण्यात आली आहे. दोन आठवड्यांपूर्वी नवी दिल्ली येथे एका दशकाहून अधिक काळानंतर अत्यंत शक्तिशाली बॉम्बस्फोट झाला. त्यात १३ लोक ठार झाले तर डझनभर जखमी झाले होते. नेतान्याहू यांनी २०१८ मध्ये शेवटचा भारत दौरा केला होता आणि पंतप्रधान मोदी यांना भेटण्यासाठी ते परत येणार होते. आता सुरक्षेच्या मूल्यांकनाच्या आधारे, पुढील वर्षी नवीन तारीख निश्चित होण्याची अपेक्षा आहे.

नेतान्याहू हे मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प या दोघांनाही आपले मित्र म्हणतात. वृत्तवाहिनीच्या या अहवालाचा हवाला देऊन, भारतीय माध्यमांमध्ये बातम्या पसरू लागल्या की, इस्रायली पंतप्रधानांनी सुरक्षेच्या कारणास्तव आपला भारत दौरा पुढे ढकलला आहे. संध्याकाळपर्यंत इस्रायली पंतप्रधान कार्यालयाला स्पष्टीकरण द्यावे लागले. इस्रायली पंतप्रधान कार्यालयाच्या विधानाबाबत, गाय अझिएल यांनी लिहिले की, सुरक्षेच्या कारणास्तव डिसेंबरमध्ये पंतप्रधान नेतान्याहू यांचा भारत दौरा पुढे ढकलण्यात आला आहे, या आमच्या विशेष वृत्तानंतर पंतप्रधान कार्यालयाने एक असामान्य निवेदन जारी केले आहे. हे विधान दोन्ही देशांमधील संबंध मजबूत करण्यावर आणि भेटीसाठी नवी तारीख निश्चित करण्यावर भर देते. भारताचे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी २० नोव्हेंबर रोजी इस्रायलमध्ये नेतान्याहू यांची भेट घेतली. या बैठकीनंतर, इस्रायली पंतप्रधानांनी २३ नोव्हेंबर रोजी 'एक्स'वर लिहिले की, आज मी गोयल यांची भेट घेतली. भारत आणि इस्रायल आपली धोरणात्मक भागीदारी मजबूत करीत आहेत. नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या



कारणास्तव त्यांचा भारत दौरा पुढे ढकलला का, या प्रश्नाचे उत्तर देताना सौदी अरेबियातील भारताचे माजी राजदूत तलमीज अहम म्हणतात, नेतान्याहू यांनी सुरक्षेच्या कारणास्तव दौरा पुढे ढकलणे भारतासाठी लज्जास्पद आहे. इस्रायली पंतप्रधानांनी आपला भारतातील सुरक्षेवर पूर्ण विश्वास आहे, असे स्पष्ट केले असले, तरी नेतान्याहू सरकारकडून ब्रीफिंगशिवाय तिथल्या माध्यमांमध्ये इतका मोठा मुद्दा प्रकाशित झाला नसता.

आजघडीला नेतान्याहू हे घरी अनेक आघाड्यांवर वेढलेले आहेत आणि या वेळी भारताला भेट देणे त्यांच्यासाठी कठीण आहे. त्यांनी सत्य सांगायला हवे होते; परंतु कथित भेट पुढे ढकलण्याचे कारण म्हणून त्यांनी सुरक्षाविषयक चिंता पुढे केल्या आहेत. हे भारताचा अपमान करणारे आहे. भारत आणि इस्रायलमध्ये बरेच प्रतीकात्मक संबंध आहेत. असे असूनही, नेतान्याहू यांनी आपला दौरा पुढे ढकलून भारताला चांगला संदेश दिलेला नाही. अमेरिकेशिवाय कोणीही त्यांच्यासोबत उभे नव्हते, तेव्हा भारत त्यांना पाठिंबा देत होता. ट्रम्प यांच्या भारताप्रति बदललेल्या भूमिकेवरून इस्रायलमध्ये वाद सुरू झाला आहे. नेतान्याहू यांनी भारताचा दौरा पुढे ढकलण्याचे कारण म्हणून सुरक्षा चिंतांचा उल्लेख करणे तर्कसंगत नाही. नेतान्याहू भारताकडून खूप अपेक्षा करत आहेत, पण भारत एका मर्यादिपलीकडे जाऊ शकत नाही. नेतान्याहू यांना वाटते की, भारत कधी तरी पॅलेस्टिनींची बाजू घेतो तर कधी तरी इस्रायलला पाठिंबा देतो. भारताने या विषयात मध्यस्थी करावी, असे इस्रायलला वाटत असले, तरी भारत तसे करणार नाही. कारण त्याच्याही काही मर्यादा आहेत. त्यातच सध्या भारत आणि अमेरिकेचे संबंध चांगले नसल्याने ट्रम्प भारताची मध्यस्थी मान्य करणार नाहीत. याची भारताला जाणीव आहे.

भारत आणि पाकिस्तानमध्ये तणाव निर्माण झाला, तर इस्रायलची प्रासंगिकता वाढते. कारण इस्रायल पाकिस्तानच्या अण्वस्त्रांना धोका मानतो. भारताचे अमेरिकेशी संबंध खराब असतील, तर इस्रायलशीही फारसे चांगले संबंध राहणार नाहीत. ट्रम्प यांनी भारतावरील कर ५० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची घोषणा केली, तेव्हा नेतान्याहू म्हणाले होते की, मोदी आणि ट्रम्प हे चांगले मित्र आहेत. ते मोदी यांना ट्रम्प यांच्याशी व्यवहार करण्यासाठी काही सूचना देतील; परंतु सार्वजनिकरीत्या नाही. नेतान्याहू यांनी भारतीय पत्रकारांच्या गटाला सांगितले की, भारत आणि अमेरिकादरम्यानच्या संबंधांमध्ये मूलभूत समजूतदारपणा आहे. दोन्ही देशांमधील संबंधांचा पाया खूप मजबूत आहे. दोन्ही देशांनी करार केला आणि करसमस्येचे निराकरण केले तर ते भारत आणि अमेरिकेच्या हिताचे असेल. हे आमच्यादेखील हिताचे असेल; कारण दोन्ही देश चांगले मित्र आहेत. नेतान्याहू यांनी या वर्षी सप्टेंबरमध्ये अमेरिकेला भेट दिली होती. 'व्हाईट हाऊस'च्या एका सल्लागाराने युक्रेनवरील रशियाच्या क्रूर हल्ल्याला 'मोदी युद्ध' म्हटले आहे. ऊर्जेसाठी भारताचे रशियावर वाढत असलेले अवलंबित्व दुःखद आहे; परंतु पुतिन यांच्या युद्ध गुन्ह्यांसाठी भारत जबाबदार नाही, असेही त्यांनी म्हटले होते. माजी इस्रायली खासदार आणि मध्य पूर्व प्रकरणांच्या तज्ज्ञ केसेनिया स्वेतलोवा यांनी या वर्षी फेब्रुवारीमध्ये मोदी आणि ट्रम्प यांच्या भेटीपूर्वी 'जेरुसलेम पोस्ट' या वृत्तपत्रामध्ये 'इस्रायलने मोदी-ट्रम्प बैठकीची काळजी का घ्यावी' या शीर्षकाचा लेख लिहिला होता.

केसेनिया स्वेतलोवा यांनी लिहिले की, भारत-मध्य पूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर (आयएमईसी) साठी भारत आणि अमेरिकेतील चांगले संबंध महत्त्वाचे आहेत. मोदी पंतप्रधान झाल्यापासून भारताचे इस्रायलशी संबंध चांगले झाले आहेत. मोदी हे इस्रायलला भेट देणारे पहिले पंतप्रधान होते. भारत-पाकिस्तान संघर्षात जगातील जवळजवळ सर्व देशांनी तटस्थ राहण्याचा प्रयत्न केला, तेव्हा इस्रायलने भारताला उघडपणे पाठिंबा दिला. २००३ मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या सरकारच्या काळात इस्रायली पंतप्रधानांची पहिली भारतभेट झाली होती. त्या वेळी एरियल शेरोन यांनी भारताला भेट दिली होती. भारत आणि पाकिस्तानमधील तणाव वाढला की भारत आणि इस्रायलमधील संबंध अधिक मजबूत होतात, असे निरीक्षण अनेक विचारवंतांनी नोंदवले आहे. पाकिस्तानकडे असलेली अण्वस्त्रे आणि अणुबॉम्ब मुस्लिम राष्ट्रांचा विरोधक म्हणून पाकिस्तान इस्रायलविरोधात वापरायला कमी करणार नाही, अशी भीती इस्रायलला वाटते. त्यामुळे या दोन देशांमध्ये तणाव होतो, तेव्हा इस्रायल-भारत संबंधांमध्ये सुधारणा होते. सध्या भारत आणि पाकिस्तानदरम्यानचे संबंध ताणलेले आहेत. अशा वेळी नेतान्याहू यांनी दौरा रद्द करायला नको होता; परंतु ट्रम्प यांच्या दबावाखाली कदाचित नेतान्याहू यांनी हा दौरा रद्द केला असावा.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

**नितीन शिरसाट**

# बिबट्यांची दहशत; नागरिकांची गस्त

राज्यातील अनेक जिल्ह्यांत सध्या बिबट्यांनी दहशत माजवली आहे. अनेक ठिकाणी मानवी वस्तीत बिबट्यांचा मुक्तसंचार दिसून येतो आहे. काही ठिकाणी तर लहानग्या मुलांवर बिबट्याने हल्ला केल्याच्याही घटना घडल्या आहेत. पण सुदैवाने या घटनेत लहान मुले वाचली असली तरी इजा मात्र गंभीर झाल्या आहेत. या घटनेने सध्या नगर पालिका निवडणुकांच्या धामधुमीत राजकीय वातावरण तापलेले असताना संपूर्ण महाराष्ट्रभर बिबट्यांची दहशत पसरली आहे. अशा परिस्थितीत बिबट्यापासून वाचवण्यासाठी वनविभागाने नागरिकांसाठी काही आदेश व उपाय जारी केले आहेत. बिबट्यांच्या वाढत्या दहशतीमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. यावर उपाय म्हणून, अनेक ठिकाणी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून गस्त वाढवण्यात आली आहे. ज्यात थर्मल ड्रोनसारख्या तंत्रज्ञानाचा वापर केला जात आहे. नागरिकांनीही स्वसंरक्षणासाठी उपाययोजना केल्या आहेत. जसे की पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यात महिलांनी गळ्यात टोकदार खिळ्यांचा पट्टा घालणे. प्रशासनाकडे बिबट्या पकडण्यासाठी पिंजरे लावण्याची आणि गस्त वाढवण्याची मागणी होत आहे. नागरिक आणि वन विभागाचे कर्मचारी मिळून गस्त घालत आहेत. बिबट्याच्या हल्ल्यांमुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई आणि परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन महाराष्ट्रात बिबटग्रस्त भागात राज्य आपत्ती जाहीर करण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. वनअधिकारी कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणे आवश्यक आहे. जंगलातील वन्यप्राणी मानवी वस्तीकडे वळू लागले आहेत. वन्यप्राण्यांमुळे शेती पिकांचे नुकसान होत आहे. तसेच प्राणघातक हल्ले करत असल्याने नागरिकांत भीतीचे वातावरण आहे. वन विभागाने यावर ठोस उपाययोजना कराव्यात अशी मागणी होत आहे. काही दिवसांपासून शहरासह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात बिबट्याचा वावर वाढला आहे.



बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेडराजा-मेहकर मार्गावर लमानदेव मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या शेतात बिबट्याचा मुक्तसंचार असल्याचे समजते. तिथे खेळत असलेल्या लहान मुलांच्या सतर्कतेमुळे हा प्रकार निदर्शनास आला व मोठा अनर्थ टळला. पाच दिवसांपासून संग्रामपूर तालुक्यातील पाच गावांत बिबट्याने दहशत माजविली आहे. काकनवाडा, वडगाववाण, खळद, कोलद, बल्लाळी या गावांत आपला डेरा टाकल्याने या भागातील शेतातील कामे प्रभावित झाली आहेत. गेल्या पाच दिवसांपासून शेतमजूर व शेतकऱ्यांनी शेताकडे जाण्यास पाठ फिरवली आहे. या पाच गावांना लागून वान नदी व अडचणीचे जंगल अशी बिबट्याला लपण्यासाठी जागा आहे. पुणे जिल्ह्यातील बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांची वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ४ अशी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि अंधार होण्यापूर्वी त्यांना घरी पोहोचता यावे यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. मागील महिन्यात बिबट्याच्या हल्ल्यात तीन लोकांना प्राण गमवावे लागले. या पृष्ठभूमीवर, शिरूर- आंबेगाव- खेड-जुन्नर या अतिसंवेदनशील बिबटप्रवण क्षेत्रातील शाळांच्या वेळात बदल करण्यात आला. गेल्या काही महिन्यांत गावोगावी दिसणाऱ्या बिबट्यांची दहशत हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. याच पृष्ठभूमीवर राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांच्या अध्यक्षतेखाली वन विभागाची महत्त्वाची आढावा बैठक संपन्न झाली. बैठकीत वन विभागाच्या संरचनात्मक विस्तारीकरण तसेच कार्यात्मक सबलीकरणासंदर्भात सविस्तर आढावा घेण्यात आला. थर्मल ड्रोन, ट्रॅप कॅमेरे, झूम स्कोप यांच्या मदतीने तसेच पथकांनी विविध भागांत बिबट्यांचा शोध सुरू केला आहे. तसेच वन विभागामार्फत शहरातील विशेषत: टेकडी परिसर व इतर मोठ्या प्रमाणात संरक्षित प्रदेशातील नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात येत आहे. बिबट्याच्या मुक्तसंचाराने परिस्थिती गंभीर झाली असून मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी शासन, प्रशासन आणि नागरिक दोन्ही स्तरांवर प्रयत्न करणे आवश्यक आहे.

९८८१७१७८२८

## इतस्तत:

# कामगार कायद्यांचे स्वरूप आणि फायदे

**दत्तात्रेय आंबुलकर**

केंद्र सरकारने नवीन कामगार कायदे लागू करण्यासंबंधी निर्णय नुकताच जाहीर केला असून, त्यामुळे सर्व राज्य सरकारांच्या माध्यमातून या कायद्यांतर्गत नियम व तरतुदींच्या अंमलबजावणीला चालना मिळणार आहे. या नव्या कामगार कायद्यांवर साधकबाधक चर्चा होणे स्वाभाविक व आवश्यकदेखील आहे. विशेषत: केंद्रीय कामगार संघटनांनी यासंदर्भात आंदोलनांसह विरोधाची भूमिका घेण्याच्या पृष्ठभूमीवर नवीन कामगार कायदे व त्यातील तरतुदींचा मुळातून अभ्यास करणे गरजेचे ठरते.

यासंदर्भात सकृद्दर्शनी सांगायचे म्हणजे, केंद्र सरकारने परंपरागत स्वरूपात लागू असणाऱ्या २९ कामगार कायद्यांचा व्यापक व सर्वसमावेशक समावेश नवीन चार कामगार कायद्यांमध्ये केला आहे. कामगारांच्या संदर्भात संख्यात्मकदृष्ट्या सांगायचे म्हणजे, आज देशांतर्गत श्रमिकक्षेत्रात सुमारे ५० कोटी कर्मचारी-कामगार कार्यरत असून, त्यापैकी अधिकांश म्हणजेच सुमारे ९० टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांचा या नव्या तरतुदींमध्ये प्रकर्षाने विचार करण्यात आल्याचे दिसून येते.

कामगार कायद्यांची संख्या व त्यातील मुख्य व महत्त्वाच्या तरतुदींची अंमलबजावणी यावर आपले मत आणि विचार व्यक्त करताना २००२ मध्ये स्थापन झालेल्या द्वितीय श्रम आयोगाने स्पष्टपणे नमूद केले होते की, भारतातील प्रचलित कामगार कायद्यांची संख्या व स्वरूप पाहता, त्यावर गांभीर्याने विचार करून केंद्र सरकारने सर्वसमावेशक व व्यापक तरतुदींसह असणारे चार ते पाच कामगार कायदे केंद्रीय स्तरावर करणे आवश्यक ठरते. त्यानंतर या मुद्यावर सुमारे १८ वर्षे फारशी चर्चा व हालचाल झाली नाही. त्यामुळेच या नव्या कामगार कायद्यांच्या संदर्भातील महत्त्व प्रकर्षाने जाणवते.

नव्या कामगार कायद्यांची रचना आणि आखणीची पूर्वतयारी म्हणून २०१४ पासून मोदी सरकारने घेतलेल्या व अंमलात आणलेल्या प्रमुख कामगार कायद्यांचा गोषवारा खालीलप्रमाणे सांगता येईल :

कामगार कायदे व नियम यांची पारदर्शी व परिणामकारक स्वरूपात अंमलबजावणी करण्यासाठी संगणकीय पद्धत आणि प्रक्रियेची अंमलबजावणी आवश्यक करण्यात आली.

ग्रॅच्युईटी रकमेची कमाल मर्यादा २९ मार्च २०१८ पासून १० लाखांहून २० लाख करण्यात आली.

१६ फेब्रुवारी २०१७ पासून कामगार वेतन कायद्यात कामगारांचे वेतन चेकद्वारा अथवा थेट त्यांच्या खात्यावर जमा करण्याची तरतूद करण्यात आली.

मातृत्वविषयक कायद्यांतर्गत २०१७ मधील नव्या तरतुदींनुसार १ एप्रिल २०१७ पासून मातृत्व रजेचा कालावधी १२ आठवड्यांहून २६ आठवडे एवढा करण्यात आला.

या पृष्ठभूमीवर नवीन कामगार कायद्यांच्या संदर्भात थोडक्यात; पण महत्त्वाच्या तरतुदी खालीलप्रमाणे सांगता येतील :

**किमान वेतनविषयक तरतुदी** : नव्या तरतुदींनुसार किमान वेतन कायदा आता सुमारे ५० कोटी कामगारांना लागू होईल. यामध्ये संघटित व असंघटित अशा दोन्ही क्षेत्रांतील कामगारांचा प्रामुख्याने समावेश करण्यात आला आहे.

**किमान वेतन** : २०१९च्या नव्या कामगार कायद्यातील तरतुदी आता सर्व उद्योगातील कामगारांना लागू करण्यात आल्या असून, त्याची दर पाच वर्षांनंतर कामगारांच्या किमान वेतनाची फेररचना केली जाणार आहे.

**सामाजिक सुरक्षा कायदा** : कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याच्या उद्देशाने नव्या कायद्यांमध्ये कामगारांना सामाजिक सुरक्षेच्या संदर्भात लागू असणाऱ्या सुमारे १३ कायद्यांचा नव्या संदर्भात समावेश करून औद्योगिक कामगारांना प्रत्येक परिस्थितीत सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत.

**कामगार सुरक्षाविषयक कायदे** : कामगारांना सर्वकालीन सुरक्षा प्रदान करण्याच्या व्यापक उद्देशाने कामगार सुरक्षा विषयाशी संबंधित अशा १३ प्रचलित कायद्यांच्या समावेशातून २०२०च्या कामगार सुरक्षा व आरोग्यविषयक कायदा लागू करण्यात आला आहे. या नव्या कायद्यातील तरतुदींनुसार, आता रोजगारासाठी अन्य राज्यांमधून येणाऱ्या कामगारांना आता त्यांच्या रोजगाराच्या राज्यात सरकारी नियमांनुसार धान्य उपलब्ध करून दिले जाईल, याचा फायदा अशा कामगारांच्या कुटुंबीयांना पण मिळेल. याशिवाय, महिला सशक्तीकरण अधिक परिणामकारक करण्यासाठी कायदेशीर तरतुदी केल्या आहेत.

**कामगार विवादांची सोडवणूक** : कामगार व कामगार संघटनांशी निगडित विवाद वा विषयांची सोडवणूक करण्यासाठी २०२० औद्योगिक संबंध कायद्यामध्ये तरतुदी करण्यात आल्या आहेत. याशिवाय, कामगारांना वार्षिक रजा मिळण्यासाठी पूर्वी असणारी वर्षात २४० दिवस काम करण्याची अट आता वर्षात १८९ दिवसांवर आणण्यात आली आहे. यानुसार, कामगारांना आता २० दिवस काम करण्यापोटी एक दिवसाची वार्षिक रजा लागू होणार आहे. संघटित क्षेत्रातील कामगारांचा रोजगार गेल्यास त्याला सरकारी योजनेनुसार, अटल विमित व्यक्ती कल्याण योजनेंतर्गत लाभ मिळू शकेल. बेरोजगार झालेल्या कामगारांसाठी हा एक नवा पर्यायी लाभ ठरू शकेल. न्यायालयीन प्रक्रियेला चालना देऊन अधिक गतिमान करण्यासाठी कामगार न्यायालयात दोन सदस्यांची नेमणूक करणे, कामगार प्रश्नाचे विवाद प्राधान्य तत्त्वावर सोडवून निर्णय देण्यासाठी आता अशा प्रकरणी निकाल देण्यासाठी एक वर्षाची कालमर्यादा घालण्यात आली आहे.

**कामगार संघटनाविषयक** : ज्या कारखाना-आस्थापनेत एखाद्या कामगार संघटनेची सदस्यसंख्या ५१ टक्के वा त्याहून अधिक असेल, अशा कामगार संघटनेला त्या आस्थापनेत कामगारांची प्रतिनिधिक कामगार संघटना म्हणून मान्यता दिली जाईल. ज्या आस्थापनेत कामगार संघटनेची सदस्यसंख्या ५१ टक्क्यांहून कमी असेल, अशा ठिकाणी विविध कामगार संघटनांच्या प्रतिनिधींची मिळून समिती स्थापित करून या प्रतिनिधींना व्यवस्थापनाशी चर्चा करण्याचे अधिकार राहतील.

**कंत्राटी कामगार कायदा** : नव्या कामगार कायद्यातील तरतुदींनुसार, कंत्राटी कामगारविषयक तरतुदी ज्या ठिकाणी ५० हून अधिक कंत्राटी कामगार असतील, अशा ठिकाणी लागू होतील. याशिवाय, कंत्राटी कामगारविषयक परवान्याची मुदत आता पाच वर्षांपर्यंत वाढविण्यात आली असून, निवडक उद्योगांमधील कंत्राटी कामगारांनी संघटना स्थापन केल्यास, निर्णय प्रक्रिया केंद्र सरकारकडे सोपविण्यात आली आहे. केंद्र सरकारच्या नव्या कामगार कायद्यांमध्ये उद्योगक्षेत्रातील कंपन्यांपासून कामगार-कंत्राटदारांपर्यंत विविध घटकांची नोंद घेतली गेली आहे, हे या धोरणाचे वैशिष्ट्य ठरले आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## आजचे संघगीत-६०

मंगळवार, २ डिसेंबर २०२५

### तुझे तेज अंगी शतांशे जरीही
### उजाळून देऊं दिशा दाहि दाही

तुझे तेज अंगी शतांशे जरीही उजाळून देऊं दिशा दाहि दाही ॥धृ.॥

स्मिताने तुझ्या विश्व तेजे भरेल, तमाचे कुठे नाव तेव्हा उरेल
मुखातून ये ना जरी शब्द काही, अभागी जना या तरी यापुढेही
तुझे धीर गंभीर ते शब्द कानी, अजूनी अम्हा देति उत्साह कार्या
पुढे चालवू कार्य तूझे सदाही, उजाळून देऊ दिशा दाहि दाही ॥१॥

समाधी तुझी ही इथे बांधिलेली, म्हणूनीच भूमी असे पुण्यशाली
हवेचा इथे हा अणूरेणु पूर्ण, तुझ्या आत्मतेजे असे दीप्तिपूर्ण
समाधिस्थ होता तुवा हा दिलेला, करांतील तो दीप आम्ही धरीला
पुढे चालवू कार्य तूझे सदाही, उजाळून देऊ दिशा दाहि दाही ॥२॥

स्मृतीने तुझ्या मात्र अश्रू गळावे, सुचावे न काही मनाशी रडावे
पुसूनीच अश्रू पुढे जावयाते तुझा याचितो स्पर्श मी एक हाते
मुखी नाम राहो सदा केशवाचे, तरूनी-तदा अश्मही जावयाचे
प्रसादे तुझ्या शक्ति ती अंगि येवो समाधीपुढे प्रार्थना हीच होवो ॥३॥

### मतदारांनी मतदानाचा हक्क चोखपणे बजावा

लोकशाही शासन व्यवस्थेमध्ये नागरिकांना मतदानाचा अधिकार प्राप्त झालेला असतो. ग्रामपंचायत, नगरपालिकांपासून तर लोकसभेपर्यंत ज्या निवडणुका होतात त्यामध्ये मतदार आपल्या मतदानाच्या माध्यमातून आपल्या पसंतीचा उमेदवार लोकप्रतिनिधी म्हणून निवडून देतो. निवडलेल्या लोकप्रतिनिधींमधून त्या त्या स्तरावरील शासन व्यवस्था निर्माण होत असल्याने मतदारांनी आपला मतदानाचा अधिकार चोखपणे बजावणे अत्यावश्यक आहे.

मंगळवार २ डिसेंबरला संपूर्ण महाराष्ट्रात नगरपालिका व नगरपंचायत निवडणूक होत आहे. आपल्या नगरामधील, शहरातील समस्या सोडविण्यासाठी मतदारांना सक्षम उमेदवारांची निवड करावयाची आहे. सक्षम नगराध्यक्षांची निवड करावयाची आहे. मतदारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेमध्ये निवडणुकीचे महत्त्व कथन केले आहे.

काही उमेदवार निवडणुका जिंकण्यासाठी मतदारांना पैशाचे प्रलोभन दाखवून त्यांची मते विकत घेण्याचा प्रयत्न करतात, खोटी आश्वासने देतात, मतदारांना दमदाटी करतात, सत्तेच्या माध्यमातून भ्रष्टाचार करतात, अशा उमेदवारांना मतदारांनी मतदान करू नये. जनसामान्याच्या हिताची व विकासाची तळमळ असणाऱ्या उमेदवारांनाच मतदारांनी निवडून द्यायला पाहिजे.

**प्रा. उदय कानतोडे**/९४२३६६३७०६


## वाचक पत्रे

### ढोंगी आणि हिंदुद्रोही पर्यावरणप्रेमी

लवकरच नाशिकला कुंभमेळा होणार आहे. नुकताच प्रयागराजला १४४ वर्षानंतर झालेला महाकुंभ सर्व विश्वात गाजला. संपूर्ण जगातले कोट्यवधी धर्मप्रेमी यात सहभागी झाले व मानसिक, धार्मिकरीत्या धन्य झाले. त्यामुळे अब्जो रुपयांची उलाढाल देखील झाली व हजारो हाताना रोजगार मिळाला. आता एवढे मोठे प्रस्तावित आयोजन करताना अनेक बाबी विचारात घ्याव्या लागतात. पहिले म्हणजे विस्तारित भव्य विशाल व योग्य जागा.

**रवी वाघमारे**/नागपूर

### सोलापूर रेल्वे स्थानकावरील प्लॅटफॉर्मची उंची कमी करावी



सोलापूर रेल्वे स्थानकात रेल्वे प्रशासन प्लॅटफॉर्म २ व ३ चे विस्ताराचे काम करणार आहेत तर डब्यातून उतरताना सध्या डबा व platform मधील अंतर (उंची) १ फूट आहे. ती कमी करून एकच लेव्हल करावे. म्हणजे ज्येष्ठ नागरिक, महिला व गुडघ्याचा त्रास असणाऱ्यांना फायदा होईल व चढ उताराचा वेळ वाचेल. व्हिल बॅगा घेऊन माणूस सोईस्कर डब्यातून आत बाहेर करू शकेल. तसेच वेळ व पाकीट मारीचे प्रसंग व सामान चोरीचे हे सर्व बंद होतील. सन २०११-१२ साली प्लॅटफार्मचे काम झाले, त्यावेळी हा उंचीचा प्रश्न निर्माण झाला. पूर्वी डबा व plateform यांची लेव्हल एकच होती. हा पण एक शारीरिक सोलापूरकरांसाठी विकासचाच भाग आहे, असे समजावे.

**- जयजीत पटवा, सोलापूर**

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# परभणी जिल्ह्यात मतदानासाठी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## जिल्हयातील सात नगरपालिका मतदानाची टक्केवारी ६०.४०

मोहन धारासुरकर

**परभणी,/प्रतिनिधी-** परभणी जिल्ह्यात मतदानासाठी मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद दुपारी ३.३० पर्यंत ५२.९८ टक्के मतदान झाले आहेत.

नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक-२०२५ च्या अनुषंगाने परभणी जिल्ह्यातील पूर्णा, गंगाखेड, सेलू, पाथरी, मानवत, जिंतूर आणि सोनपेठ नगरपरिषद निवडणूकीसाठी मतदारांचा मतदानासाठी उत्स्फ ूर्त प्रतिसाद लाभला. दुपारी ३.३० पर्यंत एकूण सरासरी ५२.९८ टक्के मतदान झाले. दुपारी ३.३० वाजेपर्यंत जिल्ह्यातील नगरपरिषदनिहाय झालेल्या मतदानाची टक्केवारी पुढीलप्रमाणे आहे. पूर्णा ४७.२ टक्के, गंगाखेड ४८.३ टक्के, सेलू- ५१.३७ टक्के, पाथरी ५८.६५ टक्के, मानवत ४९.३ टक्के, जिंतूर ५८.२८ टक्के आणि सोनपेठ ६२.४५ असे एकूण परभणी जिल्ह्यात सरासरी ५२.९८ टक्के मतदान झाले.





जिंतूर नगर परिषद निवडणूक २०२५ जिल्हा परिषद खोली क्र २ येथे मतदान करताना मा आ श्री रामप्रसादजी बोर्डीकर साहेब सोबत सुनिल भोंबे,राजेश राठोड,किशोर जाधव,रमण तोषणीवाल आणि अनिल शर्मा उपस्थित होते

## ▷ संक्षिप्त वृत्त...

### परभणीमध्ये उद्यापासून दोन दिवशीय दिव्य सत्संग राष्ट्रसंत प.पू. श्री ललितप्रभजी महाराज व डॉ. मुनिश्री शांतिप्रियजी महाराज यांचे होणार प्रवचन

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** येथील लोक कल्याणकारी सत्संग प्रवचन समिती आणि सकल जैन श्री संघ यांच्यावतीने ३ व ४ डिसेंबर रोजी परभणीत दोन दिवसीय दिव्य सत्संग व प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे.

शनिवार बाजारातील हरिप्रसाद मंगल कार्यालय येथे बुधवार ३ डिसेंबर आणि गुरुवार ४ डिसेंबर (गुरुवार) रोजी सकाळी ९ ते ११.३० या वेळेत आयोजित केलेल्या दिव्य सत्संग व प्रवचनमालेत 'जो बदलेगा आपका जीवन' या विषयावर राष्ट्रसंत प.पू. श्री ललितप्रभजी महाराज व डॉ. मुनिश्री शांतिप्रियजी महाराज याचे प्रवचन होणार आहे. अध्यात्म, नैतिक मूल्ये आणि समतोल जीवनाचे महत्त्व यावर भाष्य केले जाणार आहे. दरम्यान, जीवनपरिवर्तनाचा संदेश देणाऱ्या या प्रवचनांचा लाभ मोठ्या संख्येने भाविकांनी घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### मानवत तालुक्यात 'मूल्यवर्धन ३.०' प्रशिक्षणाचा समारोप; ४३० शिक्षकांचा सहभाग

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांमध्ये नैतिकता, सामाजिक जबाबदारी आणि सुवर्तनूक यांसारख्या मूल्यांची गरज अधिक प्रकर्षाने जाणवत आहे, हे अधोरेखित करत शांतीलाल मुथा फाउंडेशन आणि महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यभर राबविण्यात येत असलेला 'मूल्यवर्धन ३.०' उपक्रम मानवत येथे तीन टप्प्यात पूर्ण झाला.

समारोप प्रसंगी गटशिक्षणाधिकारी मंगेश नरवाडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये मूल्यसंवर्धनाची वाढती गरज अधोरेखित केली. बदलत्या जगात विद्यार्थी समाजातील प्रश्न सोडवणारे, सकारात्मक विचारणी स्वीकारणारे आणि जबाबदार नागरिक बनणे आवश्यक असून, या प्रशिक्षणातून बंधुभाव, समानता, स्वयंशिस्त यांसारखी जीवनमूल्ये दृढ होत असल्याचे त्यांनी सांगितले.

मानवत तालुक्यातील मानवत, केकरजवळा, कोल्हा, सावरगाव व मंगरूळ या केंद्रांतील जिल्हा परिषद व खाजगी संस्थांतील एकूण ४३० शिक्षकांनी या प्रशिक्षणात सहभाग नोंदविला. प्रशिक्षणादरम्यान विविध जीवनमूल्यांवर आधारित चर्चा, कृती आणि उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले.

या प्रशिक्षणाचे नियोजन व मार्गदर्शन शिक्षण विस्तार अधिकारी नीलू पवार, केंद्रप्रमुख हाडोळे, गायकवाड, मोकरे, मुळे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शांतीलाल मुथा फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक दत्ता भुजबळ, तालुका समन्वयक प्रवीण नरवाडे, तसेच बीआरसी कार्यालयातील राजकुमार गाढे, दिगंबर गिरी, गजानन वांभुरकर, आत्माराम पाटील, देवरे, जलसिंगे यांनी मोलाचे सहकार्य केले.

### सातही नगरपालिका निवडणुकांना मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद; दुपारी ३.३० पर्यंत सरासरी ५३ टक्के मतदान

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** जिल्ह्यातील सात नगरपरिषदांच्या निवडणुकांसाठी मंगळवारी सकाळी मतदानास सुरुवात झाली. दुपारी साडेतीन वाजेपर्यंत सर्व नगरपरिषदांमध्ये मिळून सरासरी ५३ टक्के मतदान नोंदविण्यात आले.

पूर्णा नगरपरिषदेमध्ये ३३ केंद्रांवर ३३ हजार ७७४ पैकी १५ हजार ९२७ (४७.२%), गंगाखेड नगरपरिषदेत ४७ केंद्रांवर ४५ हजार ४३ पैकी २१ हजार ७७३ (४८.३%), तर सेलू नगरपरिषदेत ५० केंद्रांवर ४४ हजार ९९३ पैकी २३ हजार ११४ (५१.३७%) इतके मतदान झाले.

पाथरी नगरपरिषदेत ३८ मतदान केंद्रांवर ३५ हजार २०८ पैकी २० हजार ६५१ (५८.६५%), मानवत नगरपरिषदेत ३५ केंद्रांवर ३२ हजार ५९९ पैकी १६ हजार ७० (४९.३%), तर जिंतूर नगरपरिषदेत ४४ केंद्रांवर ४१ हजार ८०७ पैकी २४ हजार ३६९ (५८.२८%) मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. तर सोनपेठ नगरपरिषदेत सर्वाधिक उत्साह पाहायला मिळाला. येथे २० मतदान केंद्रांवर १५ हजार ६१८ पैकी ९ हजार ७५४ (६२.४५%) मतदान झाले.

सातही नगरपरिषदांत मतदान प्रक्रिया सुरळीत सुरू असून मतदान केंद्रांवर दुपारी मतदारांची वाढती गर्दी दिसून आली. जिल्हाभरातील सर्व मतदान केंद्रांवर पोलिस प्रशासनाने कडक सुरक्षा व्यवस्था तैनात केली आहे.

### जिलहयात वाढली थंडी

**परभणी,दि.०२(प्रतिनिधी) :** परभणी जिलहयात गेलया दोन दिवसापासून चांगलीच थंडी जाणवू लागली आहे. तयातच वाढत जाणाऱ्या थंडीमुळे अनेकजण आपणास यामुळे अनेक अडचणी सहन कराव्या लागत आहेत. शिवाय वयोवृध्द तसेच लहान बालके यांना देखील या थंडीचा परिणाम चांगलाच परिणाम जाणवू लागला आहे. त्यातच या थंडीचा परिणाम मोठया प्रमाणात होवू लागला आहे. त्याचा परिणाम अनेक जणांवर होवू लागला आहे. यावर्षी पावसाचे प्रमाण देखील मोठया प्रमाणात वाढले आहे. त्यामुळे थंडी देखील चांगलीच जाणवू लागली आहे. त्याचा परिणाम नागरिक या थंडीने हैराण झाले आहेत. यामुळे यावर्षी अनेक जणांना थंडीचा त्रास सहन करावा लागत आहे.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

**तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.**

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# पदवीधर मतदारसंघाची प्रारूप यादी प्रसिद्ध १८ डिसेंबर पर्यंत हरकती नोंदविता येणार

विशेष प्रतिनिधी

**परभणी,/प्रतिनिधी- :** भारत निवडणूक आयोगाकडून औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या मतदार नोंदणीचा कार्यक्रम घोषीत करण्यात आला आहे. या कार्यक्रमानुसार ०१ नोव्हेंबर, २०२५ या अर्हता दिनांकावर आधारीत पात्र मतदारांची नोंदणी करण्यात येऊन मतदार याद्या तयार करण्यात येत आहेत. यानुसार ०३ डिसेंबर, २०२५ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या प्रारूप यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी दावा असल्यास किंवा समाविष्ट नावाबाबत किंवा एखाद्या नोंदीच्या तपशीला संदर्भात कोणतीही हरकत असल्यास १८ डिसेंबर, २०२५ रोजी किंवा त्यापूर्वी हरकती दाखल करण्याचे आवाहन विभागीय आयुक्त तथा मतदार नोंदणी अधिकारी जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. प्रारूप मतदार यादीची प्रत तपासणीसाठी कार्यालयीन वेळेत विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालये, उपविभागीय अधिकारी कार्यालये आणि तहसिल कार्यालये येथे उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तरी पात्र मतदारांनी आपले दावे आणि हरकती नमुना १८(नवीन नाव नोंदवणे), ७(समाविष्ट नाव वगळणे) किंवा ८ (तपशीलामध्ये बदल करणे) या नमुन्यामध्ये वेळेत दाखल करावेत, असे कळविण्यात आले आहे.

# प्रभूकृपा विद्यालयात आज मानव विकास मिशन अंतर्गत सायकल वाटप



**जिंतूर,/प्रतिनिधी-** प्रभूकृपा विद्यालयात आज मानव विकास मिशन अंतर्गत सायकल वाटप

वाघी (बो) येथे २०२४-२५ मध्ये मानवविकास अंतर्गत विद्यालयात ये - जा करणाऱ्या २४ मुलींना मोफत सायकल मंजूर झाल्या होत्या आज विद्यालयाचे संस्थाअध्यक्ष मा.श्री प्रभाकर पाटील वाघीकर यांच्या हस्ते सायकल वाटप करण्यात आले .

त्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक संतोष साखरे सर तर प्रमुख पाहुणे म्हणून उपसरपंच संतोष बडवणे,जवळा येथील माजी सरपंच दिलीपराव माने, पोलीस पाटील आकाश रोहिनकर,राजेभाऊ बोबडे,शेख रफिकभाई, गंगाधर रेंगडे,अतुल माने, बालासाहेब हारकल, विठल बोथे जमदाडे, शिनगारे, सवडकर इत्यादी पालकांची उपस्थिती होती.

सूत्र संचालन सोंनपा धुळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन दामोदर सरगर सर यांनी मानले तर ज्येष्ठ शिक्षक गजानन पाटील यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला.त्यानिमित्त त्यांचा शाल पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी होण्या साठी विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद व कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# मानवतला सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत तब्बल ७१.५२% मतदान




**मानवत,/ प्रतिनिधी-** मानवत नगरपालिकेच्या निवडणूक २०२५ अंतर्गत ११ प्रभागांमधील २२ नगरसेवक व एका नगराध्यक्ष पदासाठी मतदान पार पडले. एकूण ३२५९९ मतदान पैकी सायंकाळी ५.३० पर्यंत २३,३१६ मतदारांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. प्रभागानुसार मतदानाची आकडेवारी प्रभाग १: २,१६४,प्रभाग २: २,४१९,प्रभाग ३: २,४२३,प्रभाग ४: २,१६४,प्रभाग ५: १,८०७,प्रभाग ६: १,६५२,प्रभाग ७: २,५७५, प्रभाग ८: २,३२५,प्रभाग ९: १,९६७,प्रभाग १०: २,०५१ व प्रभाग ११: १,७६९ एकूण: २३,३१६ मतदान (७१.५२%)





पाथरी- नगरपालिकेच्या निवडणुकीमध्ये मतदानाचा हक्क बजावताना माजी आमदार बाबाजानी दिसत आहेत. याशिवाय पाथरी नगरपालिका निवडणूक ही अतिशय चुरशीची होती. या निवडणुकीत नागरिकांनी सकाळपासून मतदानासाठी केंद्रावर मतदानासाठी मोठी गर्दी केली होती. याशिवाय पाथरीत संपूर्ण मतदान शांततेत पार पडले आहे.

# परभणी जिल्हयातील सातही पालिका निवडणुकीचे भवितव्य मतपेटीत बंद



**परभणी ,/प्रतिनिधी-** जिल्ह्यातील सातही नगरपालिकेंतर्गत विविध राजकीय पक्षांच्या नेतेमंडळींसह नगराध्यक्षपदासह सदस्य पदाच्या निवडणूक रिंगणातील प्रभावी उमेदवारांनी सुधारित वेळापत्रकाप्रमाणे मंगळवारी रात्री १० वाजेपर्यंतच्या मतदान करण्यात आले असून आता या उमेदवारांचे भवितव्य मतपेटीत बंद करण्यात आले आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूकी संदर्भात दीर्घकाळातील न्यायालयीन लढाईचा निर्णय लागल्यानंतर नगरपालिकेंतर्गत सूत्रधारांसह प्रभागी अशा इच्छुक उमेदवारांनी वेध ओळखून निवडणूकांच्या दृष्टीने मोर्चेबांधणी सुरु केली होती. विशेषतः आपआपल्या कार्यक्षेत्रात मतदार यादीचा अभ्यास सुरु केला होता, अनुकूल आणि प्रतिकूल, धर्म आणि जाती-पातीच्या मतदारसंख्येचा अंदाज घेतला, नवीन मतदार नोंदणीच्या दृष्टीने अभियान सुरु केले होते. नगराध्यक्षपदासह सदस्य पदाचे आरक्षण निश्चित झाल्याबरोबर त्या त्या पालिकांतर्गत या मंडळींनी नगराध्यक्ष व सदस्यपदासाठी त्या प्रवर्गातील कोणता उमेदवार सर्वार्थाने सक्षम राहील, त्या-त्या प्रभागातील जाती-पातीची समिकरणे कशी जूळविता येतील, पॅनलमधून अनुकूल अशा उमेदवारांच्या जोड्या कशा रिंगणात उतरवता येतील, या दृष्टीने जोरदार व यशस्वी हालचाली केल्या. निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर झाल्यापाठोपाठ आपल्या व्यूहरचनेसह मोर्चेबांधणीस वेग दिला. विरोधकांच्या हालचाली, पडद्याआड व पडद्यावरच्या खेळ्या ओळखून निवडणूकीच्या रिंगणात सर्वार्थाने सक्षम व प्रभावी असे उमेदवार उतरविलेसुध्दा. त्या पाठोपाठ अडचणीच्या ठरणाऱ्या उमेदवारांसह हौशा-नवशा-गवशांचा वेगवेगळ्या क्लृप्त्यांद्वारे अर्ज माघारीसाठी वेगवेगळ्या यशस्वी खेळ्या खेळल्या, अन् प्रत्यक्ष लढतीवर म्हणजे प्रचारयुध्दावर लक्ष केंद्रीत करीत या सूत्रधारांसह प्रभावी उमेदवारांनी अल्पावधीतच आपआपल्या कार्यक्षेत्रात प्रचारयुध्दात प्रचंड धमाल उडविली होती.

या जिल्ह्यातील सातही नगरपालिकेत स्थानिक नेतृत्वाने, सक्षम उमेदवारांनी आपलं अखखं कुटूंबिय, सगे सोयरे व मित्र परिवारास प्रचारास जुंपले. रात्र थोडी सोंगे फार हे ओळखून आपआपल्या कार्यक्षेत्रातच ठाण मांडून रात्रीचा दिवस करीत या नेतृत्वाने सक्षम उमेदवारांनी या अल्पावधीतच मतदारांना आकर्षित करण्याकरीता प्रचाराच्या वेगवेगळ्या क्लृप्त्या, युक्त्या व पध्दती अवलंबविल्या. त्याचा परिणाम नगराध्यक्षपदाच्या कार्यक्षेत्रासह संबंधित प्रभागात अवघ्या दहा-बारा दिवसात प्रचाराने कळस गाठला. ते ते प्रभाग या मंडळींच्या या साऱ्या प्रचारयुध्दामुळे अक्षरशः ढवळून निघाले.

डोअर टू डोअर भेटींमुळे वाढले मतदान

या निवडणूकीत आपआपल्या प्रभागात डोअर टू डोअर पोहोचण्याकरीता सूत्रधारांसह प्रभावी उमेदवारांनी अल्पावधीतच मोठमोठ्या युक्त्या अवलंबविल्या. त्यासाठी पदयात्रा हेच एकमेव प्रचाराचे सूत्र हेरुन हे उमेदवार, त्यांचे कुटूंबिय पहाटेपासून रात्री उशीरापर्यंत घराघरातील प्रत्येक मतदारांपर्यंत संपर्क साधण्याचा आटापिटा केला. मतदार यादीतील मतदारांशी केलेल्या संपर्काचा आढावा घेऊन उर्वरित मतदारांपर्यंत पोहोचण्याकरीता चंग बांधला. त्यामुळे त्या त्या प्रभागात या पदयात्रा लक्षवेधी ठरल्या. त्याचा परिणाम वातावरण निर्मितीवर झाला. ते ते प्रभाग निवडणूकमय झाले आहेत.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# पवार-पंडित वाद; माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या घरावर दगडफेक, गाड्यांची तोडफोड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

पंडित विरुद्ध पवार ही राजकारणाच्या आखाड्यातली लढाई आज मतदानादिवशी मुद्यावरून गुद्यावर आली. वार्ड क्र. १० मध्ये पवार-पंडित यांचे पुत्र पृथ्वीराज पंडित आणि शिवराज पवार एकमेकांना भिडले. या दगडफेकीत एका गाडीचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. आज सकाळी गेवराई शहरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत ते वातावरण निवळले. अतिरिक्त पोलीस अधिक्षक सचीन पांडकर हे मोठ्या पोलीस बंदोबस्तासह सध्या गेवराईत तळ ठोकून आहेत.

गेवराई नगरपालिकेसाठी सकाळी मतदानाला सुरुवात झाली. येथे बाळराजे पवार विरुद्ध आ.विजयसिंह पंडित अशी राजकीय लढाई सुरु आहे. प्रचारात पवार-पंडित कुटुंबियांनी एकमेकांवर प्रचंड आरोप-प्रत्यारोप केले. राजकारणाच्या आखाड्यातली



लढाई अखेर मतदानादिवशी मुद्यावरून गुद्यावर आली. सकाळी साडे अकरा वाजण्याच्या सुमारास शहरातल्या वार्ड क्र. १० मध्ये पृथ्वीराज पंडित आणि शिवराज पवार हे एकमेकांना भिडले. त्याठिकाणी प्रचंड राडा सुरु झाला. पोलिसांनी हस्तक्षेप केला. त्या वेळी घटनास्थळी बाळराजे पवार आणि माजी आ. अमरसिंह पंडित आले. दोघांनी आपआपल्या कार्यकर्त्यांना समजावून सांगत आणि समजावून घेत दोघेही तेथून निघून गेले.

मात्र काही वेळानंतर बाळराजे पवार हे पंडितांच्या निवासस्थानी कृष्णाईच्या बाहेर उभा राहीले. तिथे शाब्दीक वाद झाला. बाळराजे तेथून परतल्यानंतर काही वेळाने जयसिंह पंडित-पृथ्वीराज पंडित हे पवारांच्या निवासस्थानाकडे गेले. तिथे दगडफेक झाली. या दगडफेकीत एका गाडीचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येते. पोलिसांनी आणि दंगलनियंत्रण पथकाने शहरातली अशांतता आटोक्यात आणली.

# गीता जयंतीचे औचित्य साधून नानाजी देशमुख विद्या मंदिर मध्ये गीता अध्याय स्पर्धांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

दीनदयाल शोध संस्थान संचलित, नानाजी देशमुख विद्या मंदिर मध्ये गीता जयंती मोठ्या उत्साहाने साजरी केली. भगवद्गीते मध्ये जीवनाचे सर्व सार मांडले आहे. गीतेचा जन्म दिवस म्हणून हा दिवस साजरा केला जातो. सर्वप्रथम कृष्णमूर्ती व भगवद्गीतेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. व्यासपीठावर उपस्थित अध्यक्ष म्हणून मा. श्रीमती सुनंदाताई कुलकर्णी प्रमुख पाहुणे मा.अनिताताई वजुरकर गोकुळ शिशु वाटिका प्रमुख आरतीताई जोशी उपस्थित होत्या. गीता जयंतीचे अवचित्य साधून शाळेमध्ये सामूहिक गीता अध्ययनांचे पठण घेण्यात आले. तसेच ध्रुव गट, पहिली व दुसरी



च्या विद्यार्थ्यांसाठी गीता अध्यायाची स्पर्धा ठेवण्यात आलेली होती. विद्यार्थ्यांनी खूप सुंदर रित्या गीता अध्ययन पठण केले.स्पष्ट उच्चार, व्यवस्थित पाठांतर होते. ध्रुव 'अ' गटातून प्रथम क्रमांक सरस्वती रामदासी व द्वितीय क्रमांक श्रीशा गर्जे ध्रुव गट 'ब' मधून प्रथम क्रमांक देवराज गुळवेलकर व द्वितीय क्रमांक ओवी घोलप इयत्ता पहिली या वर्गातून प्रथम क्रमांक साची पवार व द्वितीय क्रमांक विश्वजीत गुजर इयत्ता दुसरी मधून प्रथम क्रमांक उपेंद्र लांडे व द्वितीय क्रमांक अंशिका शेवाळे.

तसेच स्नेहलताई गोसावी यांनी एक गवळण सुंदर रित्या सादर करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणीत केला. अनिताताई वजुरकर व सुनंदाताई यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मधुराताई गुळवेलकर यांनी केले. आभार प्रदर्शन स्वातीताई देशपांडे यांनी केले. अशाप्रकारे कार्यक्रम व्यवस्थित रित्या पार पडला. सर्वांचे सहकार्य लाभले.

# जन शिक्षण संस्थान बीड द्वारा जागतिक एड्स निर्मूलन दिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

जन शिक्षण संस्थान बीड यांच्या वतीने नाळवंडी नाका, गांधीनगर येथे जागतिक एड्स निर्मूलन दिन कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला.अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थान बीड प्रबंध समितीच्या उपाध्यक्ष डॉ. सौ. सत्यभामा चोले, प्रमुख मार्गदर्शक डॉ. सौ. संजीवनी कोटेचा, जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक श्री. गंगाधर जी देशमुख, आणि सौ. सुरभी खोपटीकर हे होते.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. कोटेचा मॅडम यांनी उपस्थितांना अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन केले. त्यांनी शारीरिक सुदृढतेचे महत्त्व, सकस आहार, आणि सामान्य शारीरिक समस्यांबद्दल माहिती दिली.यावेळी त्यांनी एड्स आजाराची लक्षणे, यासंबंधी असलेले विविध समज-गैरसमज, घ्यावयाची काळजी, औषधोपचार आणि अफवा यावर सविस्तर माहिती दिली.

टॅटू फॅड आणि धोका डॉ. कोटेचा यांनी सध्या वाढलेल्या टॅटू काढण्याच्या फॅडवर विशेष लक्ष वेधले. त्यांनी सांगितले की, टॅटू काढताना प्रत्येकासाठी सुई बदलली जात नाही, ज्यामुळे संसर्ग वाढण्याचा धोका असतो. याउलट, डॉक्टर प्रत्येक रुग्णाला नवीन सिरिंज वापरतात. टॅटू काढताना हे नियम दूर ठेवले जातात, याबद्दल त्यांनी धोक्याची जाणीव करून दिली.यावेळी उपस्थित महिलांनी सक्रिय सहभाग घेऊन विविध प्रश्न विचारून माहिती घेतली.अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. सौ. सत्यभामा चोले यांनी योग्य दिनचर्या, आहार आणि आरोग्य या त्रिसूत्रीवर महत्त्वाचे मार्गदर्शन केले.प्रास्ताविक करताना संचालक श्री. गंगाधर जी देशमुख यांनी दीनदयाल शोध संस्थान आणि जन शिक्षण संस्थानच्या कार्याची सविस्तर माहिती दिली.सूत्रसंचालन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी श्री. सुदाम पालकर यांनी केले.कार्यक्रमासाठी प्रशिक्षक आणि प्रशिक्षिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.जन शिक्षण संस्थानने आयोजित केलेल्या या कार्यक्रमामुळे एड्स निर्मूलनासंदर्भात प्रभावी जनजागृती झाली.

## विलास पत्की यांचे दु:खद निधन



**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२ डिसेंबर**

अंबाजोगाई येथील रहिवासी विलास मार्तंडराव पत्की यांचे आज हृदय विकाराच्या धक्क्याने निधन झाले.

त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, दोन भाऊ व एक बहिण आहेत. प्रा. सतीश पत्की यांचे ते चुलत बंधू होते.

विलास पत्की यांचा अंत्यविधी सायं. ५.३० वा. अंबाजोगाई येथे होईल.

# जागतिक दिव्यांग दिन : माणसाची सेवा हीच ईश्वरसेवा
## संवेदनशीलतेची, सन्मानाची आणि समतेची हाक

जगण्याचा अर्थ विचारला तर उत्तर एकच मिळते - माणूस म्हणून दुसऱ्या माणसासाठी उभं राहणं. माणसाची सेवा हीच ईश्वरसेवा. हीच दिव्यांग दिनाची खरी प्रार्थना आहे. तीन डिसेंबर हा दिवस दरवर्षी जागतिक दिव्यांग दिन म्हणून साजरा होतो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक नोंद नसून समाजाला जागं करणारी, मनाला हलवणारी आणि संवेदनशीलतेची नव्याने आठवण करून देणारी एक मूल्यप्रणाली आहे. दिव्यांग व्यक्तींचे हक्क, संधींची समानता, अडथळामुक्त समाजव्यवस्था आणि आत्मसन्मान - ही या दिवसाची चार पायाभूत तत्त्वे आहेत. भारतासह जगभर हा दिवस उत्साहाने साजरा केला जातो. मात्र महाराष्ट्रात या वर्षी हा दिवस अधिक अर्थपूर्ण बनला कारण एका दिव्यांग युवकाच्या संघर्ष आणि कर्तृत्वाची कथा समाजात नवी प्रेरणा निर्माण करून गेली.

नवीन शासन निर्णयानुसार भारतात एकूण एकवीस दिव्यांगता प्रकार मान्य आहेत. शारीरिक, बौद्धिक, मानसिक, मज्जासंस्था, संवेदना, अंगविकार, मेंदूविकार अशा विविध स्वरूपातील अपंगत्वाचा यामध्ये समावेश आहे. अंधत्व, कमी दृष्टी, कर्णबधिरता, बोलण्यातील अडचणी, बौद्धिक अपंगत्व, मेंदूविकार, अधःकाळाचे विकार, पार्किन्सन्स, हेमोफिलिया, स्पाइनल कणा दुखापत, थॅलेसेमिया, ऑटिझम, डाऊन सिंड्रोम, ॲसिड आघात पीडित, सेरेब्रल पाल्सी - अशा अनेक प्रकारांतून हे एकवीस प्रकार निश्चित केले गेले आहेत. प्रत्येक प्रकार वेगळा, संघर्ष वेगळा, गरजा वेगळ्या. म्हणूनच दिव्यांगता ही कमजोरी नसून विविध क्षमतांची ओळख आहे.

या दिव्यांगता प्रकारांपैकी सेरेब्रल पाल्सी हा अत्यंत गंभीर आणि आयुष्यभर त्रास देणारा मेंदूचा विकार आहे. शरीरातील कडकपणा, हालचालींवरील नियंत्रण कमी होणे, तोल सांभाळण्याची अडचण, हातपाय नियंत्रणातील त्रुटी - ही याची मुख्य चिन्हे. अशा परिस्थितीत साधे उभे राहणे, चालणे, बसणे - यासाठीही खूप मोठा संघर्ष करावा लागतो.

या लाखो संघर्षकर्त्यांमध्ये जळगाव जिल्ह्यातील कुमार ऋषिकेश सुदाम माळी हे नाव तेजाने उजळते. आपल्या दिव्यांगत्वावर मात करत त्यांनी दाखवलेली जिद्द सामान्य तरुणासाठीही प्रेरणादायी आहे. जागतिक दिव्यांग दिनानिमित्त बीड तालुक्याचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी ऋषिकेश आणि त्यांची आई शीतल माळी यांची भेट घेतली. ही भेट केवळ औपचारिक नव्हती, तर एका संघर्षमय जीवनाला दिलेली मनापासूनची आदरांजली होती.

ऋषिकेशच्या शरीरात स्पास्टीसिटी



असून हालचाली मर्यादित आहेत. तरीही रसायनशास्त्र विषयात पदवी, औषध निर्माण शास्त्रातील पदविका, महाराष्ट्र राज्यस्तरीय पॅरालिम्पिक जलतरणात तृतीय क्रमांक, गायनाची आवड, वाचनाचा सखोल ओढ, रायगड किल्ला सर करणे आणि कळसूबाई शिखरावर झेंडा लावण्याचा निश्चय - या सर्व गोष्टींनी त्याच्या जिद्दीचा अर्थ अधिक ठळक केला आहे. हा प्रवास म्हणजे जिद्दीचं पुस्तक, आणि प्रत्येक पानावर हार मानण्याऐवजी उभं राहण्याची शपथ आहे.

या जिद्दीमागे त्याची आई शीतल माळी यांच्या अथक प्रयत्नांचा मोठा वाटा आहे. दिव्यांग मुलाचे संगोपन म्हणजे न संपणाऱ्या संघर्षाची यात्रा. प्रत्येक हालचालीसाठी मदत करणे, चालणे शिकवणे, पडू न देणे, मानसिक आधार देणे, उपचार, शिक्षण, समाजातील अडथळे - हे सर्व केवळ आईच करू शकते. आईच्या प्रेम, जिद्द आणि त्यागामुळेच ऋषिकेश आज आत्मविश्वासाने उभा आहे.

तहसीलदारांनी अत्यंत संवेदनशीलता दाखवत ऋषिकेशचे कौतुक केले. त्याच्या समस्या शांतपणे ऐकल्या आणि त्या योग्य पातळीवर मांडण्याचे आश्वासन दिले. ऋषिकेशला भेट देऊन प्रोत्साहन दिले. ही भेट प्रशासनातील माणुसकीची खरी ओळख ठरली.

जागतिक दिव्यांग दिनाचा मुख्य संदेश म्हणजे - समान संधी, अडथळामुक्त व्यवस्था, शिक्षणातील समावेशकता, रोजगार, स्वावलंबन आणि समाजाचा सकारात्मक स्वीकार. आजही अनेक दिव्यांग मुलांना अपमान, अडथळे, दुजाभाव, प्रवासातील अडचणी, नोकरीतील अडथळे, शिक्षणातील असमानता - यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने संवेदनशीलतेने विचार करणे अत्यावश्यक आहे.

समाजाने दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलावा. दया नको - सन्मान हवा. सहानुभूती नको - संधी हवी. दुरावा नको - सहभाग हवा. भीती नको - समज हवी. दिव्यांग म्हणजे अक्षम नव्हेत. ते वेगळ्या क्षमतांचे धनी असून अनेक क्षेत्रांत उजळून निघण्याची क्षमता त्यांच्यात आहे.

ऋषिकेश सुदाम माळी आणि त्यांची आई शीतल माळी यांच्या कथेतून एकच धडा मिळतो - दिव्यांगत्व शरीराचे असते, मनाचे नाही. धैर्य, जिद्द, प्रतिभा आणि स्वप्ने कोणत्याही अपंगत्वापुढे हार मानत नाहीत. या दिवसाचा संदेश स्पष्ट आहे - माणूसपण मोठे. त्याची मदत करणे म्हणजेच देवाची सेवा.

चंद्रकांत शेळके
तहसीलदार, बीड

# जिल्ह्यामध्ये मनाई हुकूम जारी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२ डिसेंबर**

बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्थेबाबत आगामी काळात नगरपालिका, महानगरपालिका, महापरिनिर्वाण दिन तसेच विविध प्रकारचे निदर्शने, अंदोलने, उपोषण,मोर्चे इत्यादी होण्याची शक्यता आहे. यामूळे अचानक घडणा-या घटनावरुन व किरकोळ कारणावरुन तणाव निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याअनुषंगाने कायदा व सुव्यवस्था आबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्याकडून मनाई आदेश जारी करण्यात आले आहे.

दिनांक ३ डिसेंबर २०२५ रोजीचे ००.०१ वाजेपासून ते दि. १७ डिसेंबर २०२५ रोजीचे २४.०० वाजेपर्यंत बीड जिल्हयात या कालावधीत महाराष्ट्र पोलीस कायदा ३७ (१) (३) अन्वये काढण्यात येणा-या प्रतिबंधात्मक आदेशामध्ये मोर्चे, निदर्शने, आंदोलने, धरणे आंदोलने यासारख्या आंदोलनामध्ये पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येण्यास निर्बंध राहील. जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था आबाधीत राहावी या करीता कलम ३७ (१) (३ ) अन्वये मनाई आदेश जारी केला आहे.

शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यां व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी किंवा त्यांच्या जवळपास खालील बाबीस मनाई करण्यात आली आहे.

या अन्वये शस्त्र, सोटे ,काठी, तलवार, बंदूक, लाठया, काठया, कोणतेही दाहक पदार्थ, किंवा स्फोटके, दगड, किंवा इतर क्षेपाणस्त्रे, शरीरास इजा होणा-या वस्तू बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. आवेशी भाषणे, अंगविक्षेप, विडांबनात्मक नकल, सभ्यता, नितिमत्ता यास बाधा येईल किंवा ज्यामुळे राज्याची सुरक्षिता धोक्यात येईल, किंवा अराजकता माजेल अशी चित्रे, निशाणी, घोषणा फलक किंवा इतर कोणतीही वस्तू जवळ बाळगू नये.

जाहिरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्य वाजविणे किंवा कोणतीही कृती जे देशाच्या संविधानातील मुल्ल्यांच्या विरुध्द असेल किंवा देशाचा मान व सार्वभौमत्व यांना इजा पोहचणार असेल किंवा सार्वजनिक सुरक्षा आणि सामाजिक सलोखा यांना हानी पोहचणारी असेल, व्यक्तीच्या किंवा शवांच्या किंवा प्रेते किंवा आकृती,किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन यासाठी मनाई आहे. पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तींचा समावेश असलेल्या कोणत्याही जमावास परवानगी शिवाय एकत्र येता येणार नाही, मिरवणूका मोर्चे काढता येणार नाही.

कोणताही मोर्चा, सभा, मिरवणूक व तत्सम कोणतीही कृती करण्यासाठी त्या क्षेत्रातील सक्षम पोलीस अधिका-यांची पूर्वमान्यता घेणे आवश्यक राहील. तसेच विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणूकीस लागु राहणार नाहीत व अशी कोणतीही मनाई राज्य शासनाच्या मंजूरीशिवाय १५ दिवसापेक्षा जास्त मुदतीपर्यंत अमलात राहणार नाही.

# महात्मा फुले स्मारक समिती तर्फे संविधान दिन साजरा


### संविधानाने समाजात मानवी मूल्यांची पेरणी केली - डॉ.राजेश इंगोले
### संविधानाने सामान्य माणसाला सन्मान मिळवून दिला :- प्रा.शैलजा बरूळे

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.२९ नोव्हेंबर**

येथील महात्मा फुले स्मारक समिती, अंबाजोगाई तर्फे संविधान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी विचारमंचावर सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ तथा स्मारक समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, संविधान विषयाच्या व्याख्याता प्रा.शैलजा बरूळे, रिपाइं आठवले गटाचे नेते मा.महेंद्र निकाळजे, समिती सचिव रत्नदीप गोरे, उपाध्यक्ष प्रा.अनिल नरसिंगे, कोषाध्यक्ष प्रा.डॉ.मिलिंद ढगे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात महापुरूषांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून व संविधानाच्या प्रास्ताविक वाचनाने करण्यात आली. यावेळी बोलताना समितीचे अध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी संविधानाने मानवी मूल्यांना बळकटी दिली आहे. प्रत्येक नागरिकास त्याचे हक्क अधिकार आणि कर्तव्य याची जाणीव करून देण्यात आलेली आहे. संविधानाने सर्वसामान्य माणसाला सत्तेचा केंद्रबिंदू बनविला आणि आपल्या जीवनात आहे. याचं कारण, फक्त आणि फक्त संविधान आहे असे प्रतिपादन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी केले. प्रास्ताविक प्रा.डॉ.किरण चक्रे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा.डॉ.अनिल नरसिंगे यांनी केले. तर उपस्थितांचे





आचरण कसे असावे हे शिकवले आहे हे संविधान लिहीत असताना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना तब्बल तीन वर्षांचा कालावधी लागला या कालावधीमध्ये त्यांनी भारताला महासत्ता बनविण्याचा महामार्ग बनवला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या लिखित या संविधानामुळे भारतामध्ये स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता हे मूल्य रूजविली गेली आणि भारतामध्ये मानवी मूल्य पेरली गेली. भारतामध्ये अनेक जाती, पंथ, धर्म, भाषा, प्रांत असताना भारत एकसंघ संविधान विषयाच्या व्याख्यात्या बरूळे यांनी भारतीय संविधान जगामध्ये सर्वश्रेष्ठ आहे व भारतीय संविधानाचे संदर्भ घेऊन अनेक राष्ट्रीय त्यांचा राज्य कारभार त्या पद्धतीने चालवतात या शब्दांत संविधानाचे महत्त्व विशद केले. संविधानाने सर्वसामान्य माणसाला जीवन जगण्याची प्रेरणा दिली मानवी अधिकारांची आणि कर्तव्यांचे महत्त्व समजावून सांगितले आणि याद्वारे राष्ट्राची एकात्मता कशी अबाधित राहील याकडे संविधानाने विशेष लक्ष दिले असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.मिलिंद ढगे यांनी मानले. यावेळी संविधान दिनानिमित्त संविधानावर प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली होती यामधील विजेत्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले तसेच सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. कार्यक्रमाचे यशस्वितेसाठी प्रा.सुनील नरसिंगे, विजय कचरे, संजयभाऊ साळवे, रामेश्वर खाडे, भाऊराव गवळी, प्रा.बि.के.मसने, प्रा.अनंत कांबळे, बालाजी भदरगे यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# जनतेस वेठीस धरून शहर बंद ठेवणाऱ्या विरोधकांना मतदारच धडा शिकवतील : आ. संभाजी निलंगेकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २ डिसेंबर :** नगरपरिषद निवडणुका पुढे ढकलण्याचा निवडणूक आयोगाचा निर्णय सर्वस्वी चुकीचा असून याबाबत मुख्यमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. परंतु निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन न करता विविध अफवा पसरवून

जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा विरोधक प्रयत्न करीत आहेत. निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात लोकशाही मार्गाने आंदोलन न करता निलंगा शहर बंद करून सामान्य जनतेस व व्यापाऱ्यांना वेठीस धरून राजकीय पोळी भाजून घेण्याचा प्रयत्न करणाऱ्या विरोधकांना मतदार मतदानाच्या रूपातून २० डिसेंबर रोजी मतदारच धडा शिकवतील असा विश्वास आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर यांनी केले.

मंगळवार दि २ डिसेंबर रोजी आयोजित पत्रकार परिषदेत आमदार निलंगेकर बोलत होते. यावेळी नगरपरिषद निवडणुकीतील भाजपचे पॅनल प्रमुख माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे,




भाजप शहराध्यक्ष रवी फुलारी, ॲड. वीरभद्र स्वामी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. निलंगेकर म्हणाले, नगरपरिषद निवडणुकीतील काही उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या निर्णया विरोधात न्यायालयात अपील दाखल केले होते .या अपीलार्थ्यांना निर्णय उशिरा लागल्याने त्यांना उमेदवारी मागे घेण्यास वेळ मिळाले नसल्याच्या कारणावरून निवडणूक आयोगाने निलंगा नगर परिषदेचे निवडणूक पुढे ढकलली आहे. भाजपने निवडणूक आयोगाच्या निर्णयाचे समर्थन केले नसून उलट मुख्यमंत्र्यांनी निवडणूक आयोगाच्या निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली आहे. निलंगा नगर परिषदेची निवडणूक मतदनाची प्रशासकीय यंत्रणा सज्ज असल्याने व प्रचारही व्यवस्थित झाल्याने निर्धारित वेळेत दि २ डिसेंबर रोजीच व्हावी अशी भाजपची व माझ्यासह भाजपच्या सर्व उमेदवारांची इच्छा होती. परंतु निवडणूक आयोग व न्यायालय या स्वतंत्र स्वायत्त संस्था असून त्यांचा निर्णयात कोणालाही हस्तक्षेप करता येत नाही.

विरोधक निवडणूक आयोगाच्या या निर्णयाची वस्तुस्थिती समजून न घेता, जनता मूर्ख आहे असे समजून जनतेत आमदार निलंगेकर यांच्या सांगण्यावरून निवडणूक पुढे ढकलली आहे अशी खोटी अफवा पसरवून मतदारात संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहेत. लातूर जिल्ह्याच्या सुसंस्कृत राजकारणाला काही अतिमहत्वकांक्षी व नतदृष्टे लोक बदनाम करीत आहेत. निलंगा नगर परिषद मध्ये भाजपची सत्ता आल्यानंतर जनतेला त्रास होईल व व्यावसायिकांना नुकसान होईल अशा शहर बंद आंदोलनाला पायबंद घालू व अशा शहर बंदचे समर्थन करणार नाही या वचनाम्याचे भाजपचा नगरपालिका निवडणुकीच्या जाहीरनाम्यात समावेश करणार असल्याचे आ.निलंगेकर यांनी सांगितले.



**अहमदपूर :** अहमदपूर नगर परिषदेसाठी सायंकाळी पाच वाजेपर्यंत ७०. ४४ टक्के मतदान झाले. पाच वाजेपर्यंत १३ हजार ६०२ पुरुष मतदारांनी तर १२ हजार ९५० महिला मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. मतदानाची अंतिम आकडेवारी येण्यास रात्री उशिर होण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात आले.

# नववधू प्रचिती राठोडने बजावला मतदानाचा हक्क

**त.भा. वृत्तसेवा,**
**अहमदपूर, २ डिसेंबर :** लोकशाही बळकट करण्यासाठी युवक-युवती पुढाकार घेत असल्याचे एक प्रेरणादायी उदाहरण आज पाहायला मिळाले. लग्नाच्या मंगलमय वातावरणात नववधू चि.सौ.का. प्रचिती संजय राठोड हीने अहमदपूर सार्वत्रिक निवडणूक २०२५ साठी विमलाबाई देशमुख कन्या शाळेतील मतदान केंद्रावर जाऊन संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावला.

सुहास्य फुलोऱ्यात आणि वधूच्या पोशाखात मतदान केंद्रावर पोहोचताच नागरिकांनी टाळ्यांचा कडकडाट करून तिचे स्वागत केले. यावेळी नववधूंचे तहसीलदार उज्वला पांगरकर, मुख्याधिकारी प्रतिक लंबे यांनी प्रचिती राठोडचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. तिने पहिले कर्तव्य,मतदान, नंतर संसार जीवन असा संदेश देत सर्व तरुणांसमोर आदर्श ठेवला. नववधूच्या या कर्तव्यामुळे मतदार जनजागृतीला नवी दिशा मिळाली असून युवकांनी लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांनी केले आहे. राठोड परिवारातील वधूचा भाऊ, मावशी सुनंदा चव्हाण पेशकार लातूर यावेळी मतदान केंद्रावर वधू सोबत उपस्थित होते. या कर्तव्याबद्दल सहाय्यक निवडणूक अधिकारी डॉ. मंजुषा लटपटे, तहसीलदार उज्वला पांगरकर, मुख्याधिकारी नगरपरिषद अहमदपूरचे प्रतीक लंबे, स्वीप सदस्य महादेव खळुरे, मोहन तेलंगे, बसवेश्वर थोटे, अर्चना माने, विवेकानंद भंडे, राहुल चव्हाण, सहशिक्षक संकेत गिरी यांनी कौतुक केले.




# क्रीडा ज्योत मशाल रॅलीचे महाराष्ट्र महाविद्यालयात स्वागत

**त.भा. वृत्तसेवा,**
**निलंगा, २ डिसेंबर :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे दिनांक ०४ डिसेंबर ते ०८ डिसेंबर २०२५ या कालावधीत क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले आहे. यानिमित्ताने ३० नोव्हेंबर ते ०३ डिसेंबर २०२५ दरम्यान क्रीडा ज्योत मशाल रॅली नांदेड, लातूर, परभणी, हिंगोली या ०४ जिल्ह्यांमध्ये महाविद्यालयांना भेटी देऊन महिला सक्षमीकरण व नशा मुक्त भारत याबाबत मार्गदर्शन करीत आहे. आज क्रीडा ज्योत मशाल रॅलीचे महाराष्ट्र महाविद्यालयात आगमन झाले.

यावेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ. विठ्ठल सांडूर, प्रा. शिवरुद्र बदनाळे, राष्ट्रीय छात्र सेनेचे डॉ.सचिन बसुदे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. ज्ञानेश्वर चौधरी, डॉ. मीनाक्षी बोंडगे यांनी स्वागत केले.

याप्रसंगी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मारुती गायकवाड यांनी महिला सक्षमीकरण व नशामुक्त भारत याबाबत मार्गदर्शन केले तर प्रभारी प्राचार्य डॉ. भास्कर गायकवाड यांनी नशामुक्त भारत संदर्भात उपस्थितीतांना शपथ दिली.

यानंतर सदरील रॅली लातूरकडे रवाना झाली. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्थानिक गुन्हे शाखेने जप्त केला अवैध दारूचा साठा

## एकूण ४ लाख २३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त

**त.भा. वृत्तसेवा,**
**लातूर, २ डिसेंबर :** लातूर पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखा विभागाने अवैध देशी दारूची वाहतूक करणाऱ्या वाहनांसह एकूण ४ लाख २३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका आरोपीलाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

लातूर जिल्ह्यात अवैध धंदे करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याच्या धोरणानुसार स्थानिक गुन्हे शाखेकडून शोधमोहीम राबवत येत आहे.

त्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे आदेशान्वये अपर पोलिस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात सोमवारी पहाटे स्थानिक गुन्हे शाखे च्या पथकाने एक मोठी कारवाई करून अवैध देशी दारूची वाहतूक करणारा एक आरोपी ताब्यात घेतला, तर एक आरोपी अंधाराचा फायदा घेऊन फरार झाला.

स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या गोपनिय खात्रीशीर माहितीनुसार तोंडारपाटी साखर कारखाना-हंगरगा रोडमार्गे एक चारचाकी वाहनातून मोठ्या प्रमाणात अवैध देशी दारू वाहतूक होणार असल्याची माहिती मिळाली. ही माहिती मिळताच स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून पहाटे ४.३५ वाजता तोंडारपाटी साखर कारखाना परिसरात सापळा लावण्यात आला. पथकाने एक टाटा इंडिका व्हिस्टा क्रं . एमएच १४ - एफएम- ५८८१ मधून देशी दारूची चोरटी वाहतूक करणाऱ्यांची कसून चौकशी केली. तेव्हा अंधाराचा फायदा घेऊन एक जण पळून गेला. वाहन चालक संदीप वैजनाथ शिंगे, रा. लोहारा, ता. उदगीर, जि. लातूर यास ताब्यात घेतले . तर दिपक उर्फ जंबू पंडीत बनसोडे, रा. लोहारा, ता. उदगीर हा फरार झाला. या वाहनात अवैध देशी दारूचा साठा




आढळून आला. त्यामध्ये देशी दारूच्या ३२ बॉक्स आढळून आले. या वाहतुकीसाठी वापरलेले वाहन आणि दारूची एकूण किंमत ४ लाख २३ हजार २०० रुपये एवढी आहे.

लातूर जिल्ह्यात अवैध दारू व्यवसाय, जुगार, मटका, चोरटी वाहतूक, गुन्हेगारी टोळ्यांवर कठोर कारवाई करण्यासाठी संपूर्ण पोलीस यंत्रणा सतत पाळत ठेवून आहे. अवैध धंद्यांना आळा घालण्यासाठी पुढील काळातही अधिक तीव्र मोहीम राबविण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे निर्देशावरून अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोलीस अमलदार तुळशीराम बरुरे, संजय कांबळे, सूर्यकांत कलमे, पाराजी पुठेवाड यांनी केली आहे.

# आशिव केंद्रात जागतिक दिव्यांग दिनानिमित्त योजनांचा आज जागर



**त.भा. वृत्तसेवा,**
**औसा, १ डिसेंबर :** जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जगभरात साजरा करण्यात येतो. या निमित्ताने दिव्यांग व्यक्तीच्या हक्काबाबत आणि विकासाच्या सर्व स्तरावर त्यांच्या कल्याणाबाबत जागरूकता वाढवणे आणि दिव्यांगांचे कल्याण सुनिश्रि्चत करणे आहे. सन १९९२ पासून संयुक्त राष्ट्रांनी हा दिवस साजरा करण्यास सुरुवात केली व १९९४ मध्ये जागतिक आरोग्य परिषद आणि संयुक्त राष्ट्रसंघांच्या पुढाकाराने ३डिसेंबर हा दिवस निश्चित करण्यात आला असून औसा तालुक्यातील आशिव येथील केंद्रात शैक्षणिक योजनांच्या जागराचे आयोजन करण्यात आले आहे. या दिवशी सर्वत्र जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन केले जाते तसेच दिव्यांग व्यक्तींना समाजात सामावून घेण्यासाठीच्या उपाय योजनावर भर दिला जातो. दिव्यांगांच्या समस्या समजवून घेणे त्यांना त्यांचा हक्क आणि सन्मान मिळवण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यांच्या सर्व सेवा सुविधा पोहचवणे यासाठी शिक्षण विभागातून देखील विशेष प्रयत्न करण्यात येतात अशी माहिती आशिव केंद्राचे केंद्र स्तरीय विशेष शिक्षक सचिन वळके यांनी दिली. २०२५ या वर्षात आशिव केंद्रासह औसा तालुक्यातील विविध प्रवर्गातील दिव्यांग विद्यार्थ्यांना अनेक सेवा सुविधा पुरवण्यात आल्या असून यात अल्प दृष्टी असलेल्या विद्यार्थ्यांना मोठ्या अक्षरातील पुस्तकांचे मोफत वितरण करण्यात आले.




# भक्तीचा अविष्कार म्हणजे अभंग गाथा : जगताप

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २ डिसेंबर :** अंतःकरणाच्या तन्मय भावनेतून शब्दरूपाने प्रकट होणारी भक्ती, विवेकरुपी उपासनेतील प्रेम-प्रतिमा प्रकाशित होऊन परमात्म्याच्या प्रति अनेक साधुसंतांनी अभंग संहिता पाळून लिहिलेले अभंग आहेत त्याचप्रमाणे शारदा खंडगावे यांची पांडुरंगा प्रती असलेली भक्ती, प्रेमभाव याचा अविष्कार म्हणजे हि अभंग गाथा होय. असे मत बालाजी जगताप यांनी व्यक्त केले.

चला कवितेच्या बनात या उपक्रमांतर्गत गेल्या पंधरा वर्षापासून अखंडितपणे चालू असलेल्या वाचक संवादाचे ३५० वे पुष्प सेवानिवृत्त मुख्याध्यापक बालाजी जगताप यांनी सौ. शारदा खंडगावे पाटील लिखित अभंग गाथा या साहित्यिक कृतीवर संवाद साधून गुंतले. लेखिका शारदा खंडगावे यांच्या अध्यक्षतेखाली बोलताना जगताप म्हणाले की, भक्तीरसाच्या ओलाव्याची आपल्या बोली भाषेत मांडलेली ही साधना पांडुरंगाच्या व संतांच्या चरणी समर्पित करणारे हे अभंग आहेत. या ग्रंथाची एकूण चार भागात विभागणी केलेली असून यात अभंग, संतांचा महिमा, भारुड, गवळणी व आरती व पसायदानाचा अर्थ सांगत स्वतः देवाकडे मागितलेले मागणे असून या अभंग गाथेची ही दुसरी आवृत्ती असल्याचेही ते म्हणाले. या संवादानंतर झालेल्या चर्चेत हभप. मोहन महाराज निडवंचे यांचे सह अनेकांनी सहभाग नोंदवला. शेवटी अध्यक्षीय समारोपात सौ.खंडगावे यांनी आपल्या लिखाणा मागची प्रेरणा सांगत स्वलिखित दोन भारुडे देखील गाऊन दाखवली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रिझर्व बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी मुरलीधर जाधव यांनी केले तर संवादकांचा व लेखकांचा परिचय डॉ.नामदेव खंडगावे यांनी करून दिला. आभार प्रा. राजपाल पाटील यांनी मानले.

# दुःखांच्या वाटेचा धनी होऊन नात्यांचा गुंता सोडवणारा लेखक बाबू बिरादार : प्रा. उतकर

**त.भा. वृत्तसेवा,**
**उदगीर, २ डिसेंबर :** आपल्या मातीतील माणसांच्या संवेदना कागदावरती उतरावत दुखाःच्या वाटेचा धनी होऊन नात्यांचा गुंता सोडवणारा लेखक म्हणजे बाबू बिरादार होय. असे मत प्रा. नागोराव उतकर यांनी व्यक्त केले. ते प्रसिद्ध लेखक बाबू बिरादार यांच्या प्रथम मासिक स्मृतिदिनानिमित्त पहिले पुष्प गुंफताना बोलत होते.

उदगीर येथील मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन विद्यालयात बाबू बिरादार स्मरतांना हे पहिले पुष्प त्यांच्या पहिल्या मासिक स्मृतिदिनानिमित्त गुंफण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. रामदास केदार तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. नागोराव उतकर, केंद्रीय कार्यकारिणीचे उपाध्यक्ष




रामचंद्र तिरूके, जळकोट मसापचे अध्यक्ष एम.जी. मोमीन, श्रीमती अनिता यलमटे, ज्ञानेश्वर बिरादार, डी. पी नादरगे उपस्थित होते. प्रथम बाबू बिरादार यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

प्रास्ताविक प्रा. ज्ञानेश्वर हंडरगुळीकर यांनी तर कार्यक्रमाची भूमिका धनंजय गुडसूरकर यांनी मांडली. अनिता येलमटे यांनी बाबू बिरादार यांच्या कावड, मातीखालचे पाय, अग्नीकाष्ठ, अंतपुरुषी, संभूती, आदी समग्र साहित्य लेखनाचा प्रवास उलगडून दाखवला. बाबू बिरादार यांचे लेखन नव लेखकाला प्रेरणादायी ठरेल असे मत रामचंद्र तिरूके यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात प्रा. रामदास केदार म्हणाले, गावकुसातील व गावकुसाबाहेरील सामान्य माणसांचे खरे जगणे मांडणारा हा लेखक असून त्यांचे लेखन वाचकांच्या मनाला भुरळ घालत अस्वस्थ करायला लावणारे नक्कीच आहे. असे मत व्यक्त केले. हास्यकवी डॉ .मिर्झा रफिक बेग यांना यावेळी श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमांचे सूत्रसंचलन एकनाथ राऊत यांनी तर आभार अंबादास केदार यांनी मांडले. यावेळी देवणी मसापचे अध्यक्ष शिवाजी बिरादार, विवेक होळसंबरे, पांडुरंग बिरादार ॲड. महेश मळगे, रमाकांत बनशेळकीकर, मुरलीधर जाधव, महारुद्र गालट, बापूराव नराचे, वर्षा मुस्कावाड, चंद्रदीप नादरगे यांच्यासह साहित्य रसिक उपस्थित होते. विठ्ठल नादरगे, ज्ञानोबा कुंडगिरे, प्रशांत पांचाळ, शशिकुमार पाटील, रोहित बिरादार यांनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्यात दुपारपर्यंत ५३ टक्के मतदान

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २ डिसेंबर-

नांदेड जिल्ह्यात १० नगर परिषद व एका नगर पंचायतीसाठी आज दि. २ डिसेंबर रोजी सकाळी ७.३० वाजता मतदान सुरू झाले. दुपारी ३.३० वाजेपर्यंत जिल्ह्यात ५२.९९ टक्के मतदान झाले. नगराध्यक्षांसाठी ७१ र नगरसेवक पदासाठी ८७३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. सकाळी उत्साहात सुरू झालेल्या मतदानासाठी दुपारपर्यंत अनेक मतदान केंद्रांबाहेर मतदारांच्या रांगा होत्या. किरकोळ घटना वगळता मतदान शांततेत सुरू होते.

नदिड जिल्ह्यात आज २ डिसेंबर रोजी उमरी, हदगाव, मुदखेड, देगलूर, किनवट, बिलोली, भोकर, कुंडलवाडी, लोहा, कंधार या नगरपरिषदांची तर हिमायतनगर नगरपंचायतीसाठी मतदान प्रक्रिया होत आहे. या मतदान प्रक्रियेसाठी २९१ मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. १२१ प्रभागासाठी ही निवडणूक होत आहे. या निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदाचे ७१ र नगरसेवक पदासाठी ८७३ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. या निवडणूकीत २ लाख ४५ हजार ४९४ एकूण मतदार आहेत. त्यामध्ये १ लाख २४ हजार ३५६ महिला मतदार तर १ लाख २१ हजार १२२ पुरुष मतदारांचा समावेश आहे. इतर मतदारांची संख्या १६ आहे.

मतदानासाठी जिल्ह्याभरात २९१ मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहेत. आज सकाळी ७.३० वाजता



जिल्हयात मतदान सुरू झाले. मतदानाच्या पहिल्या दोन तासात ७.६९ टक्के मतदान झाले आहे. जिल्ह्यात १८ हजार ८०८ मतदारांनी सकाळी साडेसात ते साडेनऊ या वेळेत आपला मतदानाचा अधिकार बजावला.

सकाळी ११.३० वाजेपर्यंत ४८ हजार ८२१ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला. ही टक्केवारी १९.९५ टक्के आहे. दुपारी १.३० वाजेपर्यंत ८६ हजार ८९ मतदारांनी हक्क बजावला असून याची टक्केवारी ३५.४८ टक्के अशी आहे. तर दुपारी ३.३० वाजेपर्यंत जिल्ह्यात १ लाख २८ हजार ५१५ मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावला. याची टक्केवारी ५२.९९ टक्के अशी आहे. जिल्ह्यात दुपारपर्यंत कुंडलवाडी येथे सर्वाधिक ६२.९४ टक्के मतदान झाले. विलोली येथे ६२.७० टक्के, लोहा येथे ५९.३६. हिमायतनगर

नगरपंचायतीसाठी ५८.७७टक्के मतदान झाले. देगलूर नगर परिषदेत ५५.५१ टक्के, कंधार ५१.४८, मुदखेड ४९.२५. भोकर ४८,३७, किनवट ४६.२१, उमरी येथे ४६.४८, हदगाव ४१.४० टक्के असे एकूण जिल्ह्यात ५२.९९ टक्के मतदान झाले आहे. आतापर्यंत १ लाख २८ हजार ५१५ मतदारांनी मतदानाचा आपला हक्क बजावला आहे. त्यामध्ये ६१हजार ४८५ पुरुष मतदारांचा तर ६७ हजार २७ महिला मतदारांचा समावेश आहे. सकाळी उत्साहात सुरू झालेल्या मतदानासाठी जिल्ह्यातील अनेक मतदान केंद्रांवर दुपारपर्यंत मतदारांच्या रांगा लागल्या होता.

**जिल्हाधिकाऱ्यांनी विविध मतदान केंद्रांना दिल्या भेटी**

जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी आज दिवसभर लोहा, कंधार, भोकर, उमरी आणि मुदखेड तालुक्यातील विविध मतदान केंद्रांना भेट देऊन मतदान प्रक्रियेच्या प्रगतीची पाहणी केली. यावेळी त्यांच्यासोबत जिल्हा पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार व इतर अधिकारी यांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी मतदान केंद्रांवरील मूलभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, दिव्यांग व वयोवृद्ध मतदारांसाठी उपलब्ध केलेल्या सुविधा, तसेच मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडत आहे की नाही याची तपासणी केली. यावेळी त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी संवाद साधून आवश्यक त्या सूचना दिल्या. आज जिल्ह्यातील १० नगरपरिषदा व एका नगरपंचायतीचे मतदान शांततेत आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडत असल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले.

# महाराष्ट्रात प्रथम डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयाच्या ए.आर.टी. केंद्राचे नाव देशपातळीवर

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २ डिसेंबर-

केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या अखत्यारीतील राष्ट्रीय एड्स नियंत्रण संस्था (छउज) यांनी घेतलेल्या राष्ट्रीय स्तरावरील आढावा मोहिमेत महाराष्ट्राने उत्कृष्ट कामगिरी बजावत देशातील सर्वोत्तम राज्य म्हणून मान मिळवला आहे. सप्टेंबर २०२५ च्या अंतिम गुणपत्रिकेत ७५ पेक्षा अधिक गुणांची नोंद करणाऱ्या 'ग्रीन झोन'मधील १६ केंद्रांपैकी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेडचे ए. आर. टी. केंद्र सर्वोत्कृष्ट केंद्र म्हणून निवडले जाऊन गौरविण्यात आले. मागील वर्षी २०२४-२५ मध्ये अंतिम गुणपत्रिकेत एकूण १४ इंडिकेटर मध्ये ए.आर.टी. केंद्र नांदेडचे गुण ३८ होते ते एका वर्षात वाढून ७५ झाले.

वर्ष अखेरीस ए.आर.टी. घेणारे पीएलएचआयव्ही रुग्णांचे रिटेंशन चे प्रमाण १०० टक्के कायम ठेवण्यात केंद्र यशस्वी ठरले आहे.

वर्षाच्या अखेरीस वायरल लोड सप्रेशन रेट ९७ टक्के ठेवण्यात यशस्वी ठरले आहे. गर्भवती महिलांचा वायरल लोड सप्रेशन रेट ९६ टक्के ठेवण्यात यशस्वी ठरले आहे.

हे यश ए.आर.टी. केंद्राच्या सर्व कर्मचाऱ्यांचा परिश्रमाचे फलित असल्याचे मत महाविद्यालय प्रशासनाने व्यक्त केले. एचआयव्हीग्रस्त रुग्णांच्या आरोग्याची काळजी व उपचार करून जे नावलौकिक ए.आर.टी. केंद्राने मिळवले आहे, याचा लाभ सर्व एचआयव्हीग्रस्त रुग्णांनी घ्यावा व आपले स्वास्थ्य व जीवन अधिक सदृढ करावे, असे प्रतिपादन अधिष्ठाता डॉ सुधीर देशमुख यांनी केले आहे.

अधिष्ठाता डॉ. सुधीर देशमुख, उपाधिष्ठाता व विभाग प्रमुख



डॉ. शितल राठोड यांचे मार्गदर्शन आणि ए.आर.टी. केंद्राचे नोडल अधिकारी डॉ. मोहम्मद उबेदुल्ला खान यांचा सततचा पाठपुरावा वैद्यकीय अधिकार्यांचे औषधी व्यवस्थापन नियमित आणि निरंतर रुग्णसेवा देणारे डॉ. प्रदीप जाधव आणि त्यांच्या कर्मचाऱ्याच्या मेहनतीने महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवला.

दि. १ डिसेंबर जागतिक एड्स दिनाचे औचित्य साधून सन्मानित करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रदीप जाधव, श्रीमती अंबिका कुलकर्णी, प्रताप गायवाडे, मिलिंद सूर्यवंशी, अतिश बनसोडे, सतीश अचोले,प्रीतम कांबळे, दीपक कच्छवे, श्रीमती पूजा रोकडे, डॉ. फेरोज खान, आकाश निमडगे, गणेश उपासे व सर्व आय. सी.टी.सी. कर्मचारी श्रीमती सुनीता वावळे, अश्वजीत सूर्यवंशी आणि हर्षवर्धन पंडागळे यांचा समावेश होता.

याप्रसंगी सूक्ष्मजीवशास्त्र विभाग प्रमुख डॉ संजय मोरे साहेब, वैद्यकीय अधीक्षक डॉ विजय कापसे साहेब, डॉ कपिल मोरे, जिल्हा कार्यक्रम अधिकारी डॉ. कुलदीप अंकुशे आदी मान्यवर उपस्थित होते.

## भाजपा इच्छुक उमेदवार प्रवेशिका जाधव यांचा मतदारांच्या भेटी-गाठीवर भर



**नांदेड-** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची चाहूल लागताच अनेकांनी निवडणूक लढण्याची तयारी सुरू केली असून त्यात प्रभाग क्रमांक सहा मधील प्रवेशिका जाधव यांचाही सहभाग आहे. पक्षांनी उमेदवारी जाहीर केली नसती तरी त्यांनी आतापासूनच मतदारांचा भेटीगाठी घेण्यास सुरुवात केली आहे. भारतीय जनता पार्टीचे निष्ठावान कार्यकर्ते क्षितिज जाधव यांच्या सौभाग्यवती प्रवेशिकाताई यांनी महापालिकेचे आरक्षण सोडत जाहीर होताच निवडणुकीत उतरण्याची तयारी दर्शवली. त्यादिवशी पासूनच त्यांनी आपल्या कामाला जोरदार सुरुवात केली असून प्रभागातील अनेक भागात जाऊन त्या मतदारांच्या भेटीगाठी घेत आहेत. प्रभाग क्रमांक सहा मधील बजाज नगर,धन्वंतरी कॉलनी, प्रभात नगर, सम्राट अशोक नगर, दिपनगर, नंदकिशोर नगर आदीसह अनेक भागात त्यांनी भेटी दिल्या असून नागरिकांच्या भेटी घेत त्यांच्या समस्या देखील जाणून घेत आहेत. त्यांच्या या मतदार भेटीला मतदारांचा देखील उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून प्रभाग क्रमांक सहा मध्ये क्षितिज जाधव व त्यांच्या पत्नी प्रवेशिका जाधव यांच्याच नावाची चर्चा सध्यातरी दिसून येत आहे.

## मालपाणी मूकबधिर व मतिमंद विद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**नांदेड-**आर. आर. मालपाणी मतिमंद विद्यालय व श्रीरामप्रताप मालपाणी मूकबधिर विद्यालयात आज जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विविध उपक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता काढण्यात आलेल्या प्रभात फेरीने होणार असून या फेरीत शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या उत्साहाने सहभागी होणार आहेत. समाजात दिव्यांग सक्षमीकरणाचा संदेश देणारी घोषवाक्ये आणि जनजागृतीपर फलक हे प्रभात फेरीचे विशेष आकर्षण असणार आहे. प्रभात फेरीनंतर विद्यालय परिसरात कला व क्रीडा क्षेत्रातील विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा यासाठी चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. क्रीडा स्पर्धांमध्ये धावणे, गोळाफेक, लांब उडी यांसारख्या खेळांचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, सर्जनशीलता आणि सामाजिक बांधिलकीची भावना अधिक दृढ होण्यास मदत होईल. दिवसभर चालणाऱ्या या कार्यक्रमांना विद्यालयाच्या व्यवस्थापनाकडून, मुख्याध्यापकांकडून तसेच सर्व शिक्षकांकडून उत्स्फूर्त सहभाग आणि सहकार्य मिळणार आहे. शेवटी समारोप कार्यक्रमात विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात येणार असल्याचे शाळा प्रशासनामार्फत सांगण्यात आले आहे.

## सेवा गौरव समारंभ : विद्यापीठातील दोन कर्मचाऱ्यांचा सन्मान

**नांदेड-** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील दोन मान्यवर कर्मचाऱ्यांचा सेवा गौरव समारंभ सोमवारी, दि. १ डिसेंबर २०२५ रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात उत्साहात पार पडला. भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाचे प्राध्यापक डॉ. रमेश नारायणराव ढगे आणि वरिष्ठ ग्रंथालय सहायक गणेश नारायणराव लाठकर हे दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या दीर्घ, समर्पित व उल्लेखनीय सेवेला या समारंभातून भावपूर्ण दाद मिळाली. समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन उपस्थित होते. व्यासपीठावर प्र. कुलसचिव डॉ. एम. के. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक हुशारसिंग साबळे, तसेच गणेश लाठकर यांच्यासह वर्षा लाठकर यांची उपस्थिती होती. कार्यक्रमात सर्वप्रथम प्र-कुलगुरू डॉ. महाजन यांनी निवृत्त होणारे गणेश लाठकर यांना सपत्नीक शाल, स्मृतिचिन्ह आणि मानपत्र देऊन सन्मानित केले. त्यानंतर स्वारातीम विद्यापीठ पतसंस्थेतर्फे संस्थेचे अध्यक्ष गोविंद हंबर्डे यांनीही शाल व स्मृतिचिन्ह प्रदान करून सहकारी लाठकर यांचा मनःपूर्वक गौरव केला. दरम्यान, प्राध्यापक डॉ. रमेश ढगे हे वैयक्तिक कारणास्तव समारंभास उपस्थित राहू शकले नाहीत. तरीही त्यांच्या सेवाभाव, योगदान आणि कार्याची उपस्थित मान्यवरांनी प्रशंसा केली. अध्यक्षीय समारोपात प्र-कुलगुरू डॉ. महाजन यांनी दोन्ही निवृत्त कर्मचाऱ्यांच्या कर्तृत्वाचा विशेष उल्लेख करत, उत्तम आरोग्य, समाधानकारक आणि आनंदी निवृत्त जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. सहकाऱ्यांनीही भावनिक शब्दांत जुन्या आठवणींना उजाळा देत मनःपूर्वक निरोप व्यक्त केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदीश कुलकर्णी यांनी केले. समारंभास निवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय, तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# स्वारातीम विद्यापीठात 'स्पेक्ट्रोस्कोपी' विषयावरील कार्यशाळा

तभा वृतसेवा
नवीन नांदेड, दि. २ डिसेंबर-

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या रसायनशास्त्र संकुलात 'स्पेक्ट्रोस्कोपी' या विषयावरची एकदिवसीय कार्यशाळा उत्साहात संपन्न झाली. रसायनशास्त्र संकुल, शिमाड्झू एक्सलन्स इन सायन्स ॲनालिटिकल इंडिया प्रा. लि. आणि तोशविन ॲनालिटिकल प्रा. लि., मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यशाळा शुक्रवार दि.२८ नोव्हेंबर, २०२५ रोजी आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेचे उद्घाटन रसायनशास्त्र संकुलाच्या सेमिनार हॉलमध्ये नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ.शैलेश वाढेर यांच्या हस्ते झाले. या प्रसंगी डॉ. ज्ञानेश्वर वानखेडे आणि डॉ. ओमप्रकाश




येमूल यांची उपस्थिती होती. संशोधक, विद्यार्थी आणि प्राध्यापकांनी कार्यशाळेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यशाळेदरम्यान तज्ज्ञांनी युव्ही-विजिबल स्पेक्ट्रोस्कोपी आणि एफ.टी.आय.आर. स्पेक्ट्रोस्कोपी यांच्या मूलभूत सिद्धांतांसह उपकरणांची कार्यपद्धती, नमुना, विश्लेषण, तंत्र, डेटा, इंटरप्रिटेशन तसेच संशोधनातील आधुनिक उपयोग याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

कॉपिकल इंडिया प्रा. लि.च्या अप्लिकेशन स्पेशलिस्ट दीप्ती शेट्टी यांनी एफ.टी.आय.आर.ची मूलतत्त्वे, उपकरणाची रचना आणि नव्या अनुप्रयोगांची ओळख करून दिली. तर तोशविन ॲनालिटिकल प्रा. लि., मुंबईचे रिजनल टेक्निकल स्पेशलिस्ट राजेश कांबळे यांनी यू.व्ही.एफ.टी.आय.आर. उपकरणांच्या मूलभूत देखभालीसाठी मार्गदर्शक सूचना दिल्या. कार्यशाळेचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांना अत्याधुनिक वैज्ञानिक उपकरणांची ओळख करून देणे, संशोधन कौशल्य वाढवणे आणि उद्योगमान्य तांत्रिक ज्ञान प्रदान करणे हा होता.

दुसऱ्या सत्रात तोशविन ॲनालिटिकल प्रा. लि., मुंबईचे सर्विस इंजिनिअर शशिकांत चव्हाण आणि विभागीय व्यवस्थापक श्याम कामत यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिके (हँड्स-ऑन ट्रेनिंग) दिले तसेच युव्ही-विजिबल स्पेक्ट्रोस्कोपी उपकरणाचे प्रात्यक्षिक दाखविले.

या कार्यशाळेमुळे विद्यापीठातील संशोधन पायाभूत सुविधा अधिक बळकट होऊन विद्यार्थ्यांना आधुनिक प्रयोगशाळा तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण मिळण्यास मोठी मदत होईल, असे रसायनशास्त्र संकुलाच्या संचालिका डॉ. संगीता माकोने यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रमाणपत्र वितरण आणि आभार प्रदर्शन करण्यात आले. या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी रोहिदास दुधाटे, सीमा डूबेवार, रमेश मन्नेरवार आणि ऋषिकेश पवार या संशोधक विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# जिल्हा परिषदेचे ज्येष्ठ वाहनचालक अमजद खान सेवानिवृत्त; सपत्नीक सत्कार

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २ डिसेंबर-

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे वाहनचालक म्हणून काम करणे अत्यंत जबाबदारीचे असते आणि अमजद खान यांनी ही जबाबदारी अतिशय निष्ठा, संयम आणि शिस्तीने पार पाडली, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांनी केले.

मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या उपस्थितीत सोमवार दिनांक १ डिसेंबर रोजी कै. यशवंतराव चव्हाण सभागृहात जिल्हा परिषदेच्या वतीने ज्येष्ठ वाहनचालक अमजद खान वाहिद खान यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित सत्कार सोहळा संपन्न झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, ग्रामपंचायत विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी.बी. गिरी, नरेगा उपमुख्य कार्यकारी अधिकारी




अमित राठोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रसाद चन्ना, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख, महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशांत थोरात, अभियंता राहुल रावसाहेब, अशोक भोजराज, शिंदे, शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे आदींची उपस्थिती होती.

पुढे त्या म्हणाल्या, अमजद खान यांनी शांत व तक्रारविरहितपणे तसेच वेळेचे काटेकोर पालन करत काम केले. कुठेही, कधीही जाण्याची वेळ आली तरी ते तत्परतेने उपलब्ध असत. त्यांची शिस्त, संवादकौशल्य व सेवाभाव नेहमीच स्मरणात राहील, असेही त्या म्हणाल्या. यावेळी त्यांनी त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा ही दिल्या.

कार्यक्रमात अमजद खान यांना कार्यमुक्ती आदेश, पेन्शन आदेश आणि सेवा प्रमाणपत्र मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. त्यानंतर जिल्हा परिषदेच्या वतीने शाल, साडीड्रेस, पुष्पहार देऊन त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे यांनी प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी असताना अमजद खान यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला. वाहनचालक संघटनेचे गणेश आंबेकर, माणिक बाशिंगे व संजय राऊत यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी मिलिंद व्यवहारे यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्हा परिषदेचे विभाग प्रमुख, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तन्मय गजभारेची राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी निवड

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २ डिसेंबर-

पीपल्स महाविद्यालय व्होकेशनल शाखेतील वर्ग बारावीचा विद्यार्थी तन्मय गजभारे याची कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय कॅरम स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव येथे नुकत्याच संपन्न झालेल्या विभागीय कॅरम स्पर्धेत तन्मय गजभारे या विद्यार्थ्याने घवघवीत यश संपादन केले असून कोल्हापूर येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धे साठी पात्र झाला आहे. या स्पर्धे त तन्मय कॉलेजचे प्रतिनिधित्व करणार आहे. या यशाबद्दल प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर यांनी तन्मयला मेडल प्रदान करून अभिनंदन केले. या प्रसंगी क्रीडा विभागप्रमुख प्रा. विलास वडजे, प्रा. डॉ. सुनिता माळी, प्रा. डॉ. राजेश सोनकांबळे आदी उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष व माजी खासदार डॉ. व्यंकटेश काब्दे, उपाध्यक्ष सी.ए.(डॉ.) प्रवीण पाटील, सचिव सौ. श्यामल पत्की, सहसचिव प्रफुल अग्रवाल, शालेय समिती अध्यक्ष ड. प्रदीप नागापूरकर, तसेच सर्व कार्यकारिणी सदस्य, प्रभारी प्राचार्य डॉ. शिवशंकर भानेगावकर, उपप्राचार्य डॉ. अशोक सिद्धेवाड, प्रा. डॉ. यशपाल भिंगे, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. विलास वडजे, कार्यालयीन प्रमुख रोहिदास आडे, क्रीडा सदस्य प्रा. विजय कदम, डॉ. विनायक देव, व सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी तन्मयचे अभिनंदन केले.



किनवट- नगरपरिषदेच्या मतदानाची वेळ ५-३०वाजता संपल्यानंतर सुभाष नगर येथील सुमतीबाई शाळेतील मतदान केंद्रावर एक हजारच्या वर मतदार रांगेत मतदान कधी होइल या प्रतिक्षेत

# ऑल सिख सिकलीगर असोसिएशनच्या वतीने नव विवाहीत जोडप्यांना गुरु तेगबहादूरजी यांची प्रतिमा भेट

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २ डिसेंबर-

गुरुव्दारा सचखंड बोर्डाच्या वतीने नुकताच सामुहिक विवाह सोहळा आयोजित करण्यात आला. या सोहळ्यातील सहभागी जोडप्यांना ऑल सिख सिकलीगर असोसिएशनच्या वतीने गुरु तेगबहादूरजी यांची प्रतिमा भेट देण्यात आली.

गुरुव्दारा सचखंड बोर्डाच्या वतीने आयोजित या सामुहिक विवाह सोहळ्यात २९ जोडप्यांनी सहभाग नोंदविला. यावेळी मुख्य जत्थेदार संत बाबा कुलवंतसिंह यांच्यासह बोर्डाचे



सर्व कर्मचारी उपस्थित होते. यावेळी गुरु तेगबहादूरजी यांच्या शहीदी बलिदान दिनानिमित्त ऑल सिख सिकलीगर असोसिएशनच्या वतीने २९ जोडप्यांना गुरु तेगबहादूरजी यांची प्रतिमा भेट देण्यात आली. यावेळी ऑल सिख सिकलीगर समाजाचे वरिष्ठ उपाध्यक्ष बलजितसिंघ बावरी, राष्ट्रीय महासचिव ठाकूरसिंह बावरी, प्रवक्ते गुंडासिंह तिलपितीया, जिल्हाप्रमुख पापासिंह जुन्नी यांची उपस्थिती होती.

# मुलगा हवा म्हणुन सासरकडुन छळ; विवाहीतेची आत्महत्या

तभा वृतसेवा
नांदेड, दि. २ डिसेंबर-

नवीन स्कूल व्हॅन घेण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी पूर्ण होत नसताना विवाहितेला मुलगी झाली. त्यामुळे चिडलेल्या पती आणि नणंदेकडून वारंवार मारहाण आणि मानसिक त्रास देण्यात येत होता. मारहाणीतून गर्भपातही झाला. नेहमी होत असलेल्या या छळाला कंटाळून विवाहितेने २५ नोव्हेंबर रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना शहरातील विठ्ठलनगर भागात घडली. या प्रकरणात पतीसह चार जणांविरुद्ध विमानतळ पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

मयत विवाहितेचे वडील राजेश्वर श्रीराम वानखेडे यांनी या प्रकरणात तक्रार दिली आहे. त्यांची मुलगी प्रतीक्षा हिचा लक्ष्मण भोसले याच्याशी २०२३ मध्ये विवाह लावून देण्यात आला होता. त्यावेळी लग्नात साडेचार लाख रुपये हुंडा देण्यात आला होता. काही दिवस प्रतीक्षाला सासरच्या मंडळींनी चांगले

नांदविले. परंतु, त्यानंतर मात्र पती लक्ष्मण भोसले हा दारूच्या नशेत दररोज तिला मारहाण करीत होता. तसेच नणंद माधुरी किशोर देशमुख, दीपाली रामराव देशमुख आणि भाग्यश्री सूरज देशमुख या फोनवरून शिवीगाळ करीत होत्या. प्रतीक्षा यांना पहिली मुलगी झाल्यानंतर तर मुलगा हवा म्हणून त्रास वाढतच गेला. स्कूल व्हॅन घेण्यासाठी पाच लाख रुपयांची मागणी करण्यात आली. त्यामुळे वानखेडे यांनी जावयाला ५० हजार रुपये नेऊन दिले. परंतु, त्यावरही त्यांचे समाधान झाले नाही.

प्रतीक्षा दुसऱ्यांदा गर्भवती राहिल्यानंतर मारहाणीमुळे गर्भपात झाला होता. परंतु, पती आणि नणंदेच्या वागणुकीत बदल झाला नाही. अखेर कंटाळून प्रतीक्षाने २५ नोव्हेंबर रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. ही बाब शेजाऱ्यांनी वानखेडे यांना कळविली. या प्रकरणात लक्ष्मण शंकरराव भोसले, माधुरी किशोर देशमुख, दीपाली रामराव देशमुख आणि भाग्यश्री सूरज देशमुख यांच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.